## सोशल मीडियावरील बदनामी रोखण्यासाठी विशेष समिती

**मुंबई :** सोशल मीडियाच्या माध्यमातून कोणत्याही पुराव्याशिवाय केली जाणारी वैयक्तिक बदनामी



आणि चारित्र्यहनन रोखण्यासाठी राज्य सरकार आता कठोर पावले उचलणार आहे. या संदर्भातील सद्यस्थितीतील कायदेशीर पळवाटा शोधण्यासाठी आणि आवश्यक असल्यास नवीन कायदा किंवा कठोर तरतुदी करण्यासाठी राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.१०) विधानसभेत केली. यावेळी उपस्थित तारांकित प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, सोशल मीडियावर बदनामी करण्याच्या घटनांमध्ये अलीकडच्या काळात मोठी वाढ झाली आहे. याचा फटका समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांना, विशेषतः महिलांना मोठ्या प्रमाणात बसत आहे. यावर आळा घालणे काळाची गरज आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २३२

www.ramprahar.com

◆ बुधवार, ११ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


पोलादपूरमध्ये शाळकरी मुलाचे अपहरण/२

चौक येथील महावितरणच्या लाचखोर अभियंत्याला अटक/५

खो-खो प्रीमियर लीगमध्ये मेढा संघ विजेता/८


# पनवेलच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांची आग्रही भूमिका

## अधिवेशनात विविध विषयांचा उहापोह करीत वेधले शासनाचे लक्ष

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत अर्थसंकल्पावर बोलताना आग्रही भूमिका मांडली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, विमानतळाचे नामकरण, नैना, सिडको, वीज, गरजेपोटी घरे, पाणीपुरवठा, पनवेल बसस्थानक, पायाभूत सुविधा अशा विविध विषयांचा उहापोह त्यांनी करत या सर्व विषयांवर शासनाचे लक्ष केंद्रित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाचे त्यांनी स्वागत करून हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा एक मेळ नाही, तर विकसित महाराष्ट्राचे लक्ष्य असल्याचे नमूद केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिवेशनादरम्यान सभागृहात बोलताना म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ या विश्वासाकडे नेणारा आश्वासित महामार्गाचे हे एका अर्थाने जाळे आहे. प्रगतिशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन हे राज्याला एक ट्रिलियन डॉलर नेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे व निर्णायक ठरणार आहेत. यावेळी बोलताना त्यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे महत्त्व नमूद केले. हे विमानतळ पनवेल, नवी मुंबई, एमएमआरडीए क्षेत्राला एका अर्थाने ग्लोबल बनवणार आहे. २५ डिसेंबर २०२५पासून हे विमानतळ कार्यान्वित झाले. यामुळे पनवेल आणि परिसराला उर्जितावस्था येणार आहे.



या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे केली गेली आहे. त्यासाठीसुद्धा आता लवकरात लवकर मान्यता केंद्र सरकारकडून मिळवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रयत्न झाले पाहिजेत, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात करत या विषयावर सरकारचे लक्ष वेधले.

विकासाच्या दृष्टिकोनातून बोलताना, नवी मुंबई विमानतळ हे मेट्रो ८च्या माध्यमातून मुंबई विमानतळाला जोडले जाणार आहे. मेट्रो २ नवी मुंबई, तळोजा, खांदेश्वर म्हणजेच पनवेल ते तळोजा जोडला जाणार आहे. उलवे आणि खारघर सागरी मार्ग तसेच तुर्भे-खारघर या मार्गानेही विमानतळ आणि परिसर जोडला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नैना क्षेत्राच्या बरोबरीने तिसरी मुंबईची उभारणी करण्याची घोषणा केली आहे आणि त्यामुळे हा परिसर डेव्हलपमेंट सेंटरच्या माध्यमातून उभा राहणार आहे. यालाच जोडून रेल्वे आणि रस्त्यांचे जाळे या परिसरात उभे राहत आहे. पनवेल-कर्जत रेल्वेमार्ग होत असताना पनवेल-वसई कॉरिडोर प्रस्तावित केला गेला आहे. यासह या परिसराला मोठे ट्रान्सफर हब विकसित केले जाणार आहे. विमानतळाच्या दृष्टिकोनातून नवीन शहरे केंद्रसुद्धा विकसित होणार आहेत, ज्यामध्ये एज्युसिटी, स्पोर्ट्ससिटी, इनोव्हेशन सिटी उभी राहणार आहेत. एकूण विकसित महाराष्ट्र २०४७ महाराष्ट्राचे ग्रोथ हब या क्षेत्रात उभे राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

सिडको, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, एमजेपी, एमआयडीसी, नैना अशा विविध प्राधिकरण या ठिकाणी काम करत आहेत, मात्र त्यांच्यामध्ये समन्वय नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. या प्राधिकरणामध्ये समन्वयाची आवश्यकता असण्याची गरज त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिली. पनवेल महापालिकेचे काही प्रश्न विषय आहेत, त्यावर शासनाने प्रामुख्याने लक्ष देण्याची मागणीही या निमित्ताने त्यांनी केली. (पान २ वर..)

### सिडको अधिकाऱ्यांवर ताशेरे

पनवेल महापालिका हद्दीतील सिडकोच्या ज्या जमिनी आहेत त्यामध्ये बांधकाम परवाना देताना सिडको वेगवेगळ्या अटी टाकते. त्यामुळे विकासाच्या बाबतीत अडथळे येत असतात. विकासाबाबत लोकांच्या अडचणी सोडवण्याची गरज आहे. या अनुषंगाने जे सिडकोचे अधिकारी परंपरांगत त्याच जागेवर बसले आहेत, मुजोर बनलेले आहेत ते परवानग्यांमध्ये अडथळे आणतात. गरजेपोटी घरांसंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्य सरकारने निर्णय घेतला. दुर्दैवाने या गरजेपोटी घरांच्या बाबतीतल्या निर्णयाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली नाही. त्यामुळे जी गरजेपोटी बांधलेली घरे आहेत, तीपण आता मोडकळीस आली आहेत. त्यांची पुनर्बांधणी करायची असेल, तर त्याच्यासाठी आता लवकरात लवकर कामाला सुरुवात होण्याची आवश्यकता आहे. दुर्दैवाने या दृष्टिकोनातून सिडकोचे प्रशासकीय अधिकारी कोर्टाच्या केसकडे बोट दाखवतात आणि त्यामुळे सगळी कामे थांबून राहिली आहेत. अशा वेळेला व्यवस्थापकीय संचालकांनी पुढाकार घेऊन निर्णय घेण्याची गरज आहे. अन्यथा शासनाने गरज असली तर व्यवस्थापकीय संचालक बदलण्याची आवश्यकता आहे. अधिकारी मुजोर बनले आहेत. त्यांच्यावर नियंत्रण नाही. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी सिडको व्यवस्थापकीय संचालक बदलले पाहिजे, अशी मागणी करत आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढले.

# रायगडातील १५ पंचायत समित्यांच्या सभापतीपदासाठी आज निवडणूक

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील १५ पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापतीपदांसाठी बुधवारी (दि. ११) निवडणूक आहे. यामध्ये कुठे कुणाला संधी मिळते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यातील अलिबाग, पेण, उरण, पनवेल, कर्जत, खालापूर, पाली, रोहा, मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा, तळा, माणगाव, महाड, पोलादपूर या १५ पंचायत समित्यांची निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली. त्यानंतर लगेचच ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी झाली.

शिवसेनेकडे महाड, माणगाव, पोलादपूर, अलिबाग येथे बहुमत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे रोहा, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, कर्जतमध्ये संख्याबळ आहे. भाजपने पनवेल, पेण, खालापूरमध्ये आपले वर्चस्व मिळविले आहे, तर मुरूडमध्ये आघाडी सरस ठरली आहे. त्यामुळे सत्ता कुणाकडे जाणार हे जवळजवळ निश्चित झाले आहे. आता सभापती आणि उपसभापती कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

बुधवारी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल केले जातील. दुपारी २ वाजता सभापती व उपसभापतीपदाच्या निवडणुकीसाठी बैठक होईल. बैठक सुरू झाल्यावर उमेदवारी अर्जांची छाननी होईल. यानंतर १० मिनिटांनी अर्ज वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे जाहीर केली जातील. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी १० मिनिटांचा कालावधी दिला जाईल. त्यानंतर आवश्यकता भासल्यास सभापती व उपसभापतीपदासाठी मतदान होईल.

**असे आहे आरक्षण**

**अनुसूचित जाती-म्हसळा (महिला), अनुसूचित जमाती-तळा (खुला), श्रीवर्धन (महिला), नागरिकांचा मागास प्रवर्ग-महाड (महिला), कर्जत (खुला), माणगाव (खुला), अलिबाग (महिला), सर्वसाधारण प्रवर्ग-पनवेल (महिला), खालापूर (खुला), उरण (खुला), पेण (महिला), मुरूड (खुला), रोहा (महिला), सुधागड (महिला), पोलादपूर (खुला).**

## पनवेल पंचायत समिती सभापतीपदासाठी भाजपच्या रंजना वास्कर यांच्या नावावर शिक्कामोर्तब



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने इतिहास घडवत एकहाती सत्ता मिळवली आहे. त्यानंतर येथील प्रतिष्ठेच्या सभापतीपदासाठी रंजना सदाशिव वास्कर यांच्या नावावर पक्षाने शिक्कामोर्तब केले असून त्यांनी मंगळवारी (दि.१०) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत आशीर्वाद घेतले.

भाजप महायुतीने पनवेल पंचायत समितीच्या १६पैकी तब्बल १५ जागांवर दणदणीत विजय साकारून शेकापप्रणित महाविकास आघाडीची मक्तेदारी मोडित काढली. ग्रामीण भागात प्रदीर्घ कालावधीनंतर भाजपने मिळविलेले हे घवघवीत यश विशेष असेच आहे. यावेळेस येथील सभापतीपद महिला खुला प्रवर्गासाठी राखीव असल्याने आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी सभापतीपदासाठी रंजना वास्कर यांचे तसेच उपसभापतीपदासाठी भूपेंद्र पाटील यांचे नाव निश्चित केले आहे. रंजना वास्कर या भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या कन्या असून कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सदाशिव वास्कर यांच्या पत्नी आहेत. त्या करंजाडे गणातून निवडून आल्या आहेत.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे घेतले आशीर्वाद

सभापती आणि उपसभापतीपदासाठी बुधवारी (दि.११) सकाळी ११ ते दुपारी १ दरम्यान पनवेल पंचायत समितीमध्ये अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. दुपारी २ वाजता निवडीसाठी बैठक होईल, तर त्यानंतर ३ वाजता वाजतगाजत विजयी मिरवणूक निघणार आहे. यावेळी सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन, पुढे भाजप मध्यवर्ती कार्यालय येथून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळाच्या सभागृहात नवनिर्वाचित सभापती, उपसभापतींसह सदस्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. (पान २ वर..)

## निवडक

### जिष्णू देव वर्मांनी घेतली राज्यपालपदाची शपथ

**मुंबई :** महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल



जिष्णू देव वर्मा यांनी मंगळवारी (दि. १०) राज्यपालपदाची शपथ घेतली. लोकभवनातील दरबार सभागृहात झालेल्या सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी वर्मा यांना राज्यपालपदाची शपथ दिली. शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांनी राज्यपालांचे अभिनंदन केले. वर्मा हे महाराष्ट्राचे २२वे राज्यपाल आहेत.

## देशात एस्मा कायदा लागू

### एलपीजीचा पुरवठा सुरळीत राहण्यासाठी निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



इराण विरुद्ध इस्रायल आणि अमेरिकेमधील वाढत्या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर घरगुती स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या एलपीजी या गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी केंद्र सरकारने देशभरात अत्यावश्यक वस्तू कायदा (एस्मा) लागू केला आहे.

युद्धामुळे जगातील खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. पुरवठा विस्कळीत झाल्याने महाराष्ट्रासह देशात याची घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकाराने देशात एस्मा कायदा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यामुळे देशात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळा बाजारास आळा बसणार आहे.

सरकारने तेल शुद्धीकरण प्रकल्प (रिफायनरीज) आणि पेट्रोकेमिकल युनिट्सना एलपीजीचे उत्पादन वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचप्रमाणे महत्त्वाच्या हायड्रोकार्बन स्रोतांमधून अधिकाधिक एलपीजी उपलब्ध करून देण्यास सांगितले आहे.

### विद्यार्थ्यांकडून हेरॉईन जप्त

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोलीत शिक्षण घेत असलेल्या दोन विद्यार्थ्यांकडून चार लाख ३७ हजार ५०० रुपयांचा हेरॉईन साठा पोलिसांनी सोमवारी सायंकाळी जप्त केला.

या विद्यार्थ्यांचे वय २० व २५ आहे. त्यांच्याकडून सहा हजार रुपयांची रोकड, वजनकाटा, प्लास्टिक पिशव्या सापडल्या. यातील एक विद्यार्थी तळोजातील मारवा सोसायटीत, तर दुसरा कळंबोलीतील जंक्शन सोसायटीत राहतो. पोलिसांनी दोघांवर गुन्हा नोंदवून अटक केली असून या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## तुपगाव येथील सभागृहाचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उद्घाटन



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तुपगाव येथे बांधण्यात आलेल्या सामाजिक सभागृहाचा वापर परिसरातील जनतेच्या हितासाठी व्हावा तसेच येथे जनकल्याणकारी कार्यक्रम व्हावेत, असे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी केले.

चौकजवळील तुपगाव येथे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून सुमारे एक कोटी रुपये खर्चून सामाजिक सभागृह बांधण्यात आले आहे. या सभागृहाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

अलिकडे अवेळी पाऊस पडतो. पावसाच्या हंगामाचे दिवसही वाढले आहेत. ते पाहता हे सभागृह सर्वसामान्य जनतेच्या कार्यक्रमासाठी उपयोगी पडेल, असे सांगून याची देखभाल, स्वच्छता चांगली ठेवा, असे आमदार महेश बालदी म्हणाले.

उद्घाटन समारंभास भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, चौक सरपंच रितू ठोंबरे, उपसरपंच पूजा हातमोडे, ग्रामपंचायत सदस्य, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी असोसिएशन अध्यक्ष हर्षल हनुमंते, स्नेहल महिला मंडळाचे सदस्य, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आता महिनाभरात होणार जमीन मोजणी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी आणि नागरिकांना जलद सेवा देण्यासाठी महसूल विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. आता शासकीय मोजणी कामी खासगी परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करण्यात आली असून ३० मार्चपासून हे भूमापक प्रत्यक्ष मैदानात उतरणार आहेत, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी (दि. १०) विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात दिली. यामुळे मोजणीची प्रक्रिया आता केवळ १५ ते ३० दिवसांत पूर्ण होणार आहे.

राज्यात सध्या पोट-हिस्सा, हद्दकायम, बिनशेती आणि गुंठेवारीसारख्या मोजणी प्रकरणांचा निपटारा मनुष्यबळाअभावी रखडला होता. यावर उपाय म्हणून शासनाने २०० परवानाधारक भूमापकांना दोन खासगी अभिकरणांमार्फत कार्यारंभ आदेश दिले आहेत. हे भूमापक दोन आठवड्यांचे विशेष प्रशिक्षण पूर्ण करून कामावर रूजू होतील. कामात दोष आढळल्यास खाजगी भूमापकावर दंडात्मक आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. शासकीय जमिनींवरील अतिक्रमण, एकत्रीकरण किंवा पुनर्मोजणीचे काम मात्र खाजगी भूमापकांना करता येणार नाही.




# महिला कर्मचाऱ्यांसाठी कम अर्ली-गो अर्ली सवलत

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची विधान परिषदेत घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर क्षेत्रातील शासकीय महिला कर्मचाऱ्यांसाठी कम अर्ली-गो अर्ली सवलत देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विधान परिषदेत केली. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटीबध्द असल्याची ग्वाही देत राज्यातील महिलांना योग्य सन्मान, संधी आणि सुरक्षितता देणारा समाज घडवण्याचा संकल्प अधिक दृढ करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.



आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने विधान परिषदेत प्रस्तावावर विशेष चर्चेला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी उत्तर दिले. त्यावेळी त्या म्हणाल्या, महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर कम अर्ली-गो अर्ली या निर्णयानुसार मुंबई महानगर क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांना सकाळी ९.१५ ते ९.४५ या दरम्यान कार्यालयात लवकर येऊन जितकी मिनिटे आधी कामकाज करतील, तितकीच मिनिटे संध्याकाळी कार्यालयातून लवकर निघण्याची, म्हणजेच सुमारे ३० मिनिटांची सवलत देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे गर्दीच्या वेळेत महिलांची होणारी गैरसोय कमी होऊन त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महिलांच्या सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येत असल्याचे सांगताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, चर्चगेट आणि बोरिवली स्थानकांवर सायबर गुन्हे रोखण्यासाठी यंत्रणा उभारण्यात आल्याची माहिती दिली. महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाने महिला शासकीय कर्मचाऱ्यांसाठी १८० दिवसांची प्रसूती रजा मंजूर केली असून प्रसूती रजेनंतर गरज भासल्यास कमाल एक वर्षापर्यंत वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय अर्धवेतनी रजा घेण्यासही परवानगी देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात चौथे महिला धोरण लागू करण्यात आले असून त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील महिलांचे जीवन अधिक सुरक्षित आणि सन्मानजनक व्हावे यासाठी 'आदिशक्ती अभियान' राबविण्या मागचा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

# पेण नगर परिषदेत महिलाराज!

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेची मंगळवारी सर्वसाधारण सभा नगराध्यक्षा प्रितम ललित पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली विषय समित्यांच्या सभापती पदाची निवड व स्थायी समिती गठण करण्यासाठी झालेल्या या सभेत सहा विषय समित्यांच्या प्रमुख म्हणून भाजपा राष्ट्रवादी आघाडीच्या चार महिला सदस्यांच्या नावावर उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने मंजूरी दिल्याने सभागृहात सभेच्या पिठासन अधिकारी तथा नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी या महिलांची विषय समित्यांच्या सभापती पदावर नियुक्ती जाहीर केली.



बांधकाम नियोजन, कर व शुल्क, शिक्षण व क्रिडा,महिला व बालकल्याण या विषय समित्यांच्या सभापती पदावर महिलांना संधी दिल्याने पेण नगर परिषद प्रशासनावर महिलाराज अवतरले आहे. स्थायी समितीचे गठण आणि दिलेली जबाबदारी उत्तम प्रकारे पार पडतील असा विश्वास यावेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी नवनिर्वाचित विषय समित्यांच्या सभापती पद स्वीकारलेल्या महिलांबाबत बोलताना व्यक्त केले पेण नगरपालिकेची सर्वसाधारण सभा व विषय समित्यांच्या सभापती पदासाठी निवड यासाठी नगराध्यक्षासहीत उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील सर्व सहाय्यक अधिकारी, २४नवनिर्वाचीत सदस्य याची उपस्थिती होती.सभागृहात सर्वत्र उत्सुकता शिगेला पोहोचली असतानाच स्थायी समिती गठित प्रक्रीया नगराध्यक्ष यांनी सुरू केली.

पेण नगर परिषदेच्या स्थायी समितीवर नगराध्यक्ष प्रितम पाटील स्थायी समिती सभापती प्रमुख असून, उपनगरराध्यक्ष निवृत्ती पाटील यांच्याकडे आरोग्य व विद्युत समितीचा कार्यभार देण्यात आलेला आहे. स्मिता माळी यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम व नियोजन समीती आनंद जाधव यांच्याकडे पाणीपुरवठा जलनिस्सारण समितीचा कार्यभार दिला आहे.सुनिता जोशी यांच्याकडे कर व शुल्क समितीचा कार्यभार तर कलावती पाटील यांच्याकडे महिला व बाल कल्याण समितीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.तर नव्याने निर्माण करण्यात आलेल्या क्रिडा व शिक्षण समितीची जबाबदारी आफ्रीन अखवारे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

# शाळकरी मुलाच्या अपहरणामुळे पोलादपूर तालुक्यात खळबळ

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील क्षेत्रपाळ गावातून गोळेगणी येथे हायस्कूलला जाणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्याचे क्षेत्रपाळ येथील आरोपीने अपहरण केल्याची फिर्याद त्याच्या पालकांनी पोलादपूर पोलीस ठाण्यात केली आहे. यातील आरोपीने यापूर्वीही एका अल्पवयीन बालकाचे अपहरण केले असून त्यासंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच आरोपीने दुसऱ्यांदा अन्य बालकाचे अपहरण केल्यामुळे पोलादपूर तालुक्यात खळबळ उडाली आहे.



अपहृत बालक गौरव शिंदे | आरोपी सुरेश केरू जाधव

पोलादपूर तालुक्यातील क्षेत्रपाळ गावातील नरेंद्र शिंदे हे दि. २४ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास क्षेत्रपाळ गावी अखंड हरिनाम सप्ताहाकरीता त्यांच्या पत्नीसोबत आले होते. त्यानंतर ते दोघेही होळी सणानिमित्त क्षेत्रपाळ येथे आई वडील आणि दोन्ही मुलासोबत राहत होते. दिनांक ४ मार्च रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास त्यांचा मुलगा गौरव हा परसुळे येथे शाळेत निघून गेला. त्यानंतर नरेंद्र शिंदे हे पत्नीसह मुंबई येथे जाण्यास निघाले.नरेंद्र शिंदे प्रवासात असताना क्षेत्रपाळ गावातील गणेश कदम यांनी मुलगा गौरव याला पोलादपूर येथे सुरेश जाधव यांचे सोबत पाहिल्याचे मोबाईलवरून संपर्क करून सांगितले.

क्षेत्रपाळच्या घरी फोन करून गौरवबाबत विचारणा केली असता तो घरी आला नसल्याचे समजल्याने दोन-तीन दिवसानंतर तरी त्याला घरी सोडेल याची वाट पाहून नरेंद्र शिंदे यांनी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये गौरव या अल्पवयीन बालकाचे अपहरण सुरेश जाधव याने केल्याची फिर्याद दाखल केली.

# दिवा-वीर मेमू रेल्वे सुरू करण्याची मागणी

**माणगाव : बातमीदार ,प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगाव शहरात दररोज हजारो नागरिक, पर्यटक आणि प्रवासी ये-जा करत असल्यामुळे शहरात सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून दिवा ते वीर मेमू रेल्वे सेवा सुरू करावी तसेच अधिकाधिक एक्स्प्रेस रेल्वे गाड्यांना माणगाव स्थानकात थांबे द्यावेत, अशी मागणी माणगाव रेल्वे प्रवासी संघटनेचे सचिव सुरेश जैन यांनी केली आहे.




माणगाव शहरातून जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गावर रोजच वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवासी व स्थानिक नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. रखडलेल्या महामार्गाच्या कामांमुळे अनेक ठिकाणी अपघात होऊन निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागत असल्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे प्रवासाचा ताण कमी करण्यासाठी रेल्वे सेवा अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित होत आहे.

माणगाव हे रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने दररोज हजारो पर्यटक आणि प्रवासी येथे येत असतात. त्यामुळे माणगाव रेल्वे स्थानकावर सर्व प्रकारच्या रेल्वे गाड्यांना थांबे देण्यात यावेत, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. दोन वर्षांपूर्वी खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नातून काही एक्स्प्रेस गाड्यांना थांबे मिळाले असले तरी अद्यापही अनेक महत्त्वाच्या गाड्या माणगाव स्थानकावर थांबत नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन आणि तळा या तालुक्यातील प्रवाशांचा माणगाव स्थानकाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. सध्या थांबा असलेल्या रेल्वे गाड्यांना अक्षरशः हाऊसफुल्ल प्रतिसाद मिळत असून यामुळे रेल्वे प्रशासनालाही आर्थिकदृष्ट्या मोठा फायदा होत असल्याचे प्रवासी संघटनेने सांगितले आहे.

माणगाव येथेही जनशताब्दी, मंगला, नेत्रावती, मत्स्यगंधा, कोकणकन्या आणि ऋषिकेश यांसारख्या महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्यांना थांबे मिळाल्यास प्रवाशांना मोठा दिलासा मिळू शकतो. याशिवाय दिवा ते रोहा या मार्गावर ज्या पद्धतीने रेल्वे सेवा सुरू आहे, त्याचप्रमाणे दिवा ते वीर मेमू रेल्वे सेवा दिवसातून तीन ते चार वेळा सुरू केल्यास माणगावसह रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, दरम्यान, रोहा ते वीर या रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण पूर्ण झाले असून वीर येथे रेल्वे गाड्या थांबविण्यासाठी आवश्यक ट्रॅक व सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे दिवा ते वीर मेमू सेवा सुरू करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे. याबाबत बोलताना खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, माणगाव येथे अधिकाधिक रेल्वे गाड्यांना थांबे मिळावेत यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत आणि लवकरच याबाबत सकारात्मक निर्णय मिळेल अशी अशा व्यक्त केली

पान १ वरुन

## पनवेलच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांची आग्रही भूमिका

शहरांना पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टिकोनातून एमजेपी, एमआयडीसी, सिडको व नवी मुंबई महापालिकेकडून पाणीपुरवठा होतो. तो योग्य प्रमाणात होण्यासाठी या सर्व प्राधिकरणांमध्ये समन्वयाची आवश्यकता आहे. सिडकोने या परिसरात मोरबे धरण विकसित केले, पण ते नवी मुंबई महापालिकेला दिले गेले आणि आता ही महापालिका सिडकोला पाणी देत नाही. त्यामुळे सिडको व पनवेल महापालिकांमध्ये पाण्याच्या तुटवडा भासत आहे. म्हणून स्टीमसारखी ऑथॉरिटी जी ठाणे जिल्ह्यात निर्माण झाली तशी ऑथॉरिटी या भागात तयार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

नैना प्राधिकरण २०१३ साली तयार झाले, मात्र त्यावेळी सुरुवातीला २३ गावे आयडीपीमध्ये बनवली. सुरुवातीला या गावांसंदर्भात नैना प्राधिकरणाने निर्णय घ्यायचा होता, पण निर्णय घेतला नाही. मग छोट्या छोट्या टीपी स्कीम बनवल्या ज्यात सुसूत्रता नाही. निविदा निघाल्या, पण अंमलबजावणी नाही. शेतकऱ्यांना प्लॉट दिले त्याबद्दल हरकती आहेत, त्यातही निर्णय घेतले नाहीत. या सर्व निर्णयांमध्ये पारदर्शकता नाही. नैना प्राधिकरण ज्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मुलाखतीत आणि सभागृहात म्हणणे मांडले. नैनासंदर्भात निर्णय घ्यायचे असतील तर सक्षम अधिकारी आणि यंत्रणा स्वतंत्र्यरित्या उभी केली पाहिजे, तेव्हाच नैनासारखे प्राधिकरण सक्षमपणे काम करू शकणार आहे. हे शहर लवकर उभे राहिले पाहिजे जे शासनाला अभिप्रेत असेल, तर स्वतंत्र आयएएस अधिकारी देऊन नैना प्राधिकरण उभे केले पाहिजे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केले.

महापालिका हद्दीत विकासाच्या बाबतीत वेगवेगळ्या अनेक संकल्पना मांडण्यात आल्या आहेत. या सर्व परिसरामध्ये आता मुंब्रा ते पनवेल, कळंबोली परिसरात वाहतूक कोंडी होत आहे. ती सोडविण्यासाठी रस्त्यांचे जाळे उभे राहत आहे, पण वाहतूक कोंडी लक्षात घेता कळंबोली ते शिळफाटा सहापदरी उन्नत मार्ग बनवण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी केली तसेच प्रदूषणाच्या बाबतीत बोलताना रासायनिक कारखान्यांमुळे परिसराला दुर्गंधीचा शाप भेडसावत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे प्रदूषणावर नियंत्रण आणले पाहिजे आणि त्यासाठी आवश्यक कार्यवाही झाली पाहिजे, यावर त्यांनी जोर दिला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल बसस्थानकाचा मुद्दा पुन्हा उपस्थित केला. बीओटी धर्तीवर बसस्थानक विकसित करण्याचे ठरले, पण त्यात अनेक अडथळे आले. दीर्घकाळापासून पुनर्विकासासाठी पाठपुरावा सुरू आहे. परिवहनमंत्र्याकडेही कायम पाठपुरावा राहिला आहे. या बसस्थानकाच्या कामाला लवकरात लवकर सुरू व्हावी. त्याचबरोबर भूमिगत विद्युत केबल व तत्सम विद्युत कामांसंर्दभात आरडीएसएसच्या बाबतीत जाहीर झालेल्या निधीच्या कामाला सुरुवात करण्याचीही मागणी त्यांनी केली.

अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्राला ताकद देण्याचे काम केले जाणार आहे. पनवेल आणि परिसरालादेखील मोठी ताकद दिली जाणार आहे. हा अर्थसंकल्प म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महाराष्ट्राच्या हितासाठी २४ तास काम करणारा मॅन ऑफ एक्शन आहे. या प्रतिमेला साजेसा अर्थसंकल्प महाराष्ट्राला ग्रोथ इंजिन बनवणारा असा आहे. पनवेल आणि रायगडातील सामान्य नागरिक, शेतकरी या सर्वांसाठीसुद्धा प्रगतीची नवी कवाडे उघडली जात आहे. युग नवं प्रगतीचं, शाश्वत आणि दमदार विकासाचं या ओळीप्रमाणे या अर्थसंकलपाचे स्वागत करतो, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद करून अर्थसंकल्पाला पाठिंबा देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आभार मानले.

## पनवेल पंचायत समिती सभापतीपदासाठी भाजपच्या रंजना वास्कर यांच्या नावावर शिक्कामोर्तब

या पार्श्वभूमीवर रंजना वास्कर आणि भूपेंद्र पाटील यांनी मंगळवारी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, पं.स. सदस्य अंकुश खैर, युवा मोर्चा पळस्पे विभागीय अध्यक्ष योगेश लहाने, विचुंबेचे सरपंच प्रमोद भिंगारकर, सचिन केवारे, कुणाल काठे आदी उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रंजना वास्कर आणि भूपेंद्र पाटील यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# श्री झोलाई देवी सीसीटीव्ही यंत्रणेसाठी सुरेंद्र चव्हाणकडून ५१ हजारांची देणगी

**महाड : प्रतिनिधी**



महाड तालुक्यातील ऐतिहासिक देवस्थान असलेल्या श्री झोलाई देवी मंदिरासाठी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यासाठी महाड मधील समृद्धी व्यवसायीक व भाजपा नेते सुरेंद्र चव्हाण यांनी ५१ हजार रुपयांची देणगी श्री झोलाई देवीचरणी अर्पण केली आहे. महाड तालुक्यातील विन्हेरे गावची ऐतिहासिक देवस्थान असलेल्या व ८४ गावची मालकीण असलेल्या श्री झोलाई देवी मंदिराच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आवश्यक असणारी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यासाठी समृद्धी हॉटेलचे मालक व भाजप नेते सुरेंद्र चव्हाण यांनी छबिना उत्सवामध्ये देणगी दिल्याबद्दल त्यांचे झोलाई देवी संस्थानतर्फे आभार मानले.

# महाडच्या आदित्य नर्सिंग होममध्ये आयुष्यमान भारत योजना कार्यान्वित

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील ग्रामीण भागातील गरजू व गरीब रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना अंतर्गत उपचार मोफत मिळण्याचे सुविधा आता आदित्य महामुणकर यांच्या आदित्य नर्सिंग होम येथे सुरू करण्यात आली असून, प्राथमिक स्वरूपात या ठिकाणी हृदयविकार संबंधित एन्जोप्लास्टी ही आयुष्यमान भारत योजने अंतर्गत मोफत केली जाणार असल्याचे डॉक्टर महामुणकर यांनी यावेळी सांगितले.




महाराष्ट्र शासनाच्या आयुष्यमान भारत योजना ही पाच लाखापर्यंत मोफत योजना असून महात्मा फुले जन आरोग्य योजना हे देखील विविध शासकीय रुग्णालयामध्ये कार्यरत आहे. मात्र खाजगी रुग्णालयात देखील चांगल्या प्रकारचे उपचार रुग्णांना मिळावेत या उद्देशाने शासनाने खाजगी रुग्णालयामध्ये देखील या योजना लागू करण्याचे सक्तीचे केले असले तरी, सर्वच रुग्णालयांमध्ये या सुविधा सुरू झालेल्या नव्हत्या. मात्र महाड सारखे छोट्या शहरांमध्ये डॉक्टर आदित्य महामुणकर यांनी पुढाकार घेत आदित्य नर्सिंग होम या हृदयरोग चिकित्सालयात आयुष्यमान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे लाभ रुग्णांना देण्यास सुरुवात केली आहे. शासनाच्या या योजनेचा लाभ गरीब व गरजू रुग्णांनी घ्यावा असे आवाहन डॉक्टरांनी यावेळी केले. तसेच रुग्णांना हृदयविकाराचा झटका आल्यानंतर त्यांची अंजॉग्रफी केली जाईल व जर एन्जोप्लास्टी करायची असेलच तर त्या रुग्णाला ऍडमिट करून त्याच्यावरती पूर्णपणे मोफत एंजोप्लास्टी केली जाईल.

सध्या प्राथमिक स्वरूपात ही एकच उपचार असली तरी भविष्यात सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया व दुर्धम्य आजारांवर या योजनेच्या अंतर्गत मोफत उपचार केले जाणार असल्याचे डॉक्टर महामुणकर यांनी यावेळी बोलताना सांगितले. मात्र यासाठी प्रत्येक नागरिकांनी आपले आयुष्यमान भारत नोंद करून घेणे गरजेचे आहे, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तात्काळ उपचार सुरू करता येऊ शकतो.

# मुंबई मराठी पत्रकार संघात एआय परिषद

**मुंबई : प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) या वेगाने विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानामुळे माध्यमविश्वात मोठे परिवर्तन घडत आहे. पत्रकारिता, कथाकथन आणि चित्रपट निर्मिती यामध्ये एआय च्या वाढत्या वापराचा वेध घेण्यासाठी मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे 'एआय परिषद २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे.




शनिवार, १४ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत हा विशेष कार्यक्रम मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित करण्यात येणार आहे. 'भविष्याच्या माध्यमजगतात एआय ची नवी दिशा' या विषयावर ही परिषद होणार असून पत्रकार, कंटेंट क्रिएटर्स, फिल्ममेकर आणि डिजिटल माध्यमांमध्ये काम करणार्यांसाठी हा कार्यक्रम उपयुक्त ठरणार आहे.

या परिषदेचे उदघाटन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंग (आयपीएस) यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ पत्रकार आणि माहिती तंत्रज्ञान विषयक लेखक माधव शिरवळकर, एआय कम्युनिटी बिल्डर आणि एआय फेस्टिव्हल आयोजक अनुराग तिवारी, अनुभवी फोटो जर्नलिस्ट व पुरस्कारप्राप्त एआय फिल्ममेकर प्रसाद गोरी, पुरस्कारप्राप्त एआय फिल्ममेकर व स्टोरीटेलर सागर चोगले, प्रोफेशनल सिनेमॅटोग्राफर व एआय ॲड मेकर प्रियंकु सरमा, तसेच एआय एज्युकेटर आणि डिजिटल स्टोरीटेलर अशोक रेड्डी हे प्रमुख वक्ते मार्गदर्शन करणार आहेत., अशी माहिती अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली. परिषदेत एआय फिल्ममेकिंगचे लाईव्ह डेमो, एआय स्टोरीटेलिंग, डिजिटल कंटेंट क्रिएशनमध्ये एआय चा वापर, पत्रकारिता आणि मीडिया क्षेत्रातील एआय, एआय आधारित चित्र व व्हिडिओ निर्मिती, सोशल मीडिया कंटेंट, भारतीय भाषा आणि एआय, एआय मधील नवे ट्रेंड, क्रिएटिव्हिटी व कल्पनाशक्ती यांसारख्या विविध विषयांवर चर्चा होणार आहे. याशिवाय एआय तज्ज्ञांसोबत थेट संवाद, नेटवर्किंगची संधी आणि खुल्या प्रश्नोत्तरांचे सत्रही आयोजित करण्यात येणार आहे. यासंदर्भातील अधिक माहितीसाठी कार्यक्रमाचे समन्वयक राजेश खाडे (९८१९८४५५६६) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन कार्यवाह शैलेंद्र शिर्के यांनी केले आहे.

## पोलीस भरतीमध्ये तरुणांचा प्रताप
# उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन जप्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान चार उमेदवारांकडे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन जप्त करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी चारही उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून कळंबोली पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना कळंबोली येथील पोलीस मुख्यालयात सोमवारी सकाळी पावणेनऊच्या सुमारास उघडकीस आली.

पोलीस बनण्याचे स्वप्न घेऊन भरती प्रक्रियेत सहभागी झालेल्या उमेदवारांनीच कायद्याचा भंग केल्याने अखेर त्यांनाच पोलीस ठाण्याच्या कारवाईला सामोरे जावे लागले. मुंबईसह राज्यभरात पोलीस शिपाई आणि चालक पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. उमेदवारांना उन्हाळ्याचा त्रास होऊ नये यासाठी नवी मुंबई पोलिसांनी पहाटेपासूनच भरती प्रक्रियेची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे उमेदवारांना उन्हाच्या झळा कमी सहन कराव्या लागल्या. तसेच नवी मुंबई पोलिसांनी केलेल्या उत्तम नियोजनामुळे उमेदवारांना



शारीरिक चाचणीदरम्यान चांगले मैदान आणि इतर आवश्यक सुविधा कळंबोली (रोडपाली) येथील पोलीस मुख्यालयात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. २०२४-२०२५ या वर्षासाठी पोलीस शिपाई, चालक पोलीस शिपाई आणि बँड्समन अशा एकूण ५२७ विविध पदांचा समावेश या भरती प्रक्रियेत आहे. या भरतीसाठी सुमारे ५४ हजार उमेदवारांनी अर्ज नोंदवले आहेत.

दरम्यान, सोमवारी पोलीस शिपायांच्या सतर्कतेमुळे चार संशयित उमेदवारांकडे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. विशेष म्हणजे भरती प्रक्रियेदरम्यान अशा प्रकारची घटना प्रथमच उघडकीस आली आहे. या घटनेनंतर इतर उमेदवारांचीही तपासणी अधिक काटेकोरपणे करण्यात आली.

इंजेक्शन जप्त केलेल्या उमेदवारांचे वय अनुक्रमे २१, २६, २९ आणि ३० वर्षे असे आहे. त्यापैकी तीन उमेदवार अहिल्यानगर जिल्ह्यातील तर एक उमेदवार पुणे जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर आली आहे. या उमेदवारांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन आणि इंजेक्शन देण्यासाठी वापरली जाणारी सुई आढळून आली. पोलीस मुख्यालयातच त्यांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने त्यांना तत्काळ कळंबोली पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी या चारही उमेदवारांवर बीएनएस २०२३ चे कलम २२३, ६२ तसेच औषधीद्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम १९४० चे कलम १८ (क)(फ) अन्वये गुन्हा नोंदविण्याच्या सूचना दिल्या.

> **शारीरिक चाचणीदरम्यान शरीरावर परिणाम करणारे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन उमेदवारांनी घेऊ नये. कारण अशा इंजेक्शनचा दूरगामी परिणाम संबंधित उमेदवाराच्या मनावर आणि शरीरावर होऊ शकतो. जे उमेदवार करिअरच्या सुरुवातीलाच शॉर्टकट वापरण्याचा प्रयत्न करतील, ते पोलीस खात्यात दाखल झाले तरी टिकणार नाहीत. उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी असे शॉर्टकट कोणीही वापरू नयेत. असे यश कायम टिकत नाही.**
> **-संजय येनपुरे,**
> पोलीस सहआयुक्त, नवी मुंबई

# कोमसाप रायगडचा स्त्री सन्मान पुरस्कार सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलांचे लेखन सत्याच्या जवळ जाणारे असून नव्या बदललेल्या वातावरणात महिलांचे लेखन आयुष्याची खरी बाजू दाखवते असे उद्गार कवी अरुण म्हात्रे यांनी पनवेल येथे काढले. जागतिक महिला दिनानिमित्ताने कोकण मराठी साहित्य परिषद रायगडच्या वतीने सन्मान कर्तृत्वाचा अंतर्गत स्त्री सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रायगड जिल्ह्यातील साहित्यिक महिलांना पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

पनवेलच्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृह येथे झालेल्या समारंभास पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, चित्रपट नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, नगरसेविका दर्शना भोईर, कोमसापाचे रायगडचे अध्यक्ष संजय गुंजाळ, जिल्हा प्रतिनिधी



गणेश कोळी, महिला प्रमुख संध्या दिवकर, युवाशक्ती प्रमुख सिद्धेश लखमदे आदी उपस्थित होते.

चित्रपट नाट्य निर्मात्या कल्पना विलास कोठारी यांनी, आजच्या या युगामध्ये स्त्रिया अनेक क्षेत्रात स्वतःचं कर्तृत्व दाखवत आहेत. स्त्रियांनी आपल्या आयुष्यामध्ये स्वतःच्या आनंदासाठी नेहमी जागृत रहावे, असा त्यांनी संदेश देऊन साहित्यातील क्षेत्रातील महिलांचा सन्मान करण्याचा उत्सव कौतुकास्पद आहे, असे त्यांनी सांगितले. कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याने सामाजिक बांधिलकी जपत, पनवेल तालुक्यातील कर्नाळा किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेली कोरलवाडीतील महिलांनी इतर नागरिकांप्रमाणे आम्हालाही शुद्ध पाणी मिळावे या मागणीसाठी रायगड जिल्हा परिषदेच्या कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आणि त्यांच्या या लढायला यश मिळाले त्याबद्दल जय भवानी महिला बचत गटाच्या सुवर्णा गुरुदास वाघे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक रायगड महिला प्रमुख संध्या दिवकर यांनी केले तर आभार योगिनी वैदू यांनी मानले.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंना गव्हाण विद्यालयात अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

शिक्षक सागर रंधवे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांच्यासह गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील, रंजिता मुंबईकर, ज्योत्स्ना कोळी, अरुण कोळी व नववीच्या विद्यार्थ्यांनी प्रतिमा पूजन करून क्रांतीज्योतींना अभिवादन केले.

आरोही बापू नाळे व स्मित कुंदन मोकल यांनी कवितांचे वाचन केले. हर्षला पाटील यांनी सूत्रसंचालन केले. देवेंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता नववी अ या वर्गाने कार्यक्रमाचे आयोजन केले.



# सीकेटी विद्यालयात जागतिक महिला दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागामध्ये जागतिक महिला दिवस उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. जनार्दन भगत प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसाचे म्हणजेच अमृत महोत्सवाचे औचित्य साधून हा कार्यक्रम मुख्याध्यापक संतोष चव्हाण व पर्यवेक्षिका नीरजा मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आला.

प्रकाश पांढरे तसेच प्रमोद शेळके यांनी भाषण केले. स्वाती मॅडम यांनी कविता सादर केली. शशिकला पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. चैताली सुर्वे, प्राची इसे, महेश पोपटा यांनी गीत गायले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन अशोक पाटील यांनी केले.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सीकेटी विद्यालयामधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर पुरुष वर्गांनी मिळून सर्व शिक्षक महिलांना सुंदर असे भेटवस्तू देऊन कार्यक्रम सुंदररित्या पार पाडले.

# भारतीय क्रिकेट संघाच्या विजयाचा पनवेलमध्ये जल्लोष

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय क्रिकेट संघाने आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत तिसऱ्यांदा ऐतिहासिक विजय मिळवत संपूर्ण देशाचा अभिमान उंचावला आहे. या अभूतपूर्व कामगिरीमुळे देशभरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून प्रत्येक भारतीयाला आपल्या क्रिकेट संघाचा अभिमान वाटत आहे.

या विजयाच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहरातील ॲम्बुलन्स चालक-मालक जनहित संस्थेच्या वतीने भव्य विजयी रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीद्वारे संस्थेच्या सदस्यांनी भारतीय क्रिकेट संघाला मानाचा मुजरा देत त्यांच्या विजयाला सलामी दिली. रॅलीदरम्यान ॲम्बुलन्स वाहनांवर तिरंगा ध्वज लावून शहरातून फेरी काढण्यात आली.

या रॅलीत संस्थेचे अध्यक्ष मुकुंद कांबळे, सचिव विजय जाधव, उपाध्यक्ष प्रकाश जाधव, पनवेलचे सचिव राज निम्बर्गी, सहखजिनदार कैलास नेमाडे, पनवेलचे खजिनदार भरत पाटील यांच्यासह संतोष निम्बर्गी, अनिकेत नेमाडे, संजय जाधव, गणेश खंदारे, हरीश कांबळे, ज्ञानेश्वर जाधव, तन्वी विजय जाधव, पूर्वी विजय जाधव आणि इतर अनेक सदस्य मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

# नवीन पनवेलच्या ज्येष्ठ नागरिक संघात महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघात जागतिक महिला दिन खूप उत्साहात साजरा झाला. अध्यक्ष डॉ. अरविंद बेलापूरकर, उपाध्यक्ष चंद्रकांत डांगरे, खजिनदार मेहेंदर्ग यांनी दीपप्रज्वलन केले. प्रास्ताविक सचिव विकास वाणी तर सूत्रसंचालन वर्षा जोशी ह्यांनी केले.

कल्पना पाटील यांनी प्रवेशद्वारावर सुंदर रांगोळी रेखाटली होती. विजया करंडे, वर्षा महेंदर्गे, शुभांगी कुलकर्णी व विलास चव्हाण ह्यांनी महिला दिनाशी सुसंगत अशा स्वलिखीत कविता सादर केल्या. विजया



करंडे दिग्दर्शित 'टूर निघाली' ही नाटिका महिला कलाकारांनी सहजतेने सादर करत निराळीच बहार आणली.

जया वझे यांनी झाला आनंद आली बहार या गाण्यावर नृत्य सादर केले तर शोभा पराडे यांनी दिली आपल्या सुमधूर आवाजात आले विसाव्याचे क्षण हे गाणे सादर केले. सतीश व्यवहारे यांनी पुरुषांच्या दृष्टीकोनातून महिलांचे महत्त्व या विषयावर आपले विचार मांडले मंजुषा तळणीकर यांच्या कल्पनेतून आयोजित खाद्य जत्रेस सभासदांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

महिला सभासदांसाठी आयोजित रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत संपदा बेहरे यांनी प्रथम, वर्षा मेहेंदर्गे यांनी द्वितीय तर प्रगती निडारकर. मराठी नाट्यसृष्टीशी संबंधित अनोख्या स्मरणशक्ती स्पर्धेत अंजली अंधारे यांनी प्रथम, सुनीता रास्ते यांनी द्वितीय तर वर्षा मेहेंदर्गे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. ही स्मरणशक्ती स्पर्धा आबा टिपणीस यांनी प्रायोजित केली होती.

सर्वश्री प्रमोद कोरडे, भानुदास व्यास, घनश्याम आहुजा, पद्मनाभ भागवत व श्रीकांत देशपांडे यांनी महिलांच्या गौरवार्थ घोषवाक्ये सादर केली. आशा व्यास व आबा टिपणीस यांनी आठवणी सांगितल्या.



**पनवेल : जागतिक महिला दिनानिमित्त भोकरपाडा येथील ॐ श्री महालक्ष्मी सोसायटीतर्फे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजप युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, माजी उपसरपंच मुकेश फडके, युवा नेते हनुमान फुलोरे, गणेश फुलोरे, दीपक फुलोरे, दिनेश फडके आदी उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयात जागतिक महिला दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. महिला दिनानिमित्त इतिहासात गाजलेल्या महिलांचे प्रतिमापूजन शशिकला पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे,ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, सुरेश पारखे तसेच चारुशीला ठाकूर, सारिका ठाकूर, वृषाली म्हात्रे, ज्योत्स्ना कोळी, दर्शना माळी, प्रतिज्ञा घरत, रंजीता पाटील, सुजाता शेलार, मोनाली बाबर, शितल ठाकूर यांनीही प्रतिमापूजन करून कार्यक्रम यशस्वी केला.

यावेळी इयत्ता सहावी अ च्या वतीने महिला शिक्षकांना लेखणी आणि संपूर्ण स्टाफला खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी वर्ग प्रतिनिधी सिद्दिक शेख, मुन्ना चौहान यांनी पुढाकार घेतला. सिमरन संजय डाकवे या इयत्ता सहावी ब च्या मुलीने उत्कृष्ट असे महिला दिनाचे महत्त्व सांगितले.

यावेळी विविध वेशभूषा करून आलेल्या मुलींनीदेखील आपले मनोगत व्यक्त केले.

# खानावळे ग्रामपंचायतीतर्फे महिला दिन साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खानावळे ग्रुप ग्रामपंचायतीतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सरपंच कीर्ती संतोष लबडे, सदस्य रविना पाटील, ग्रामसंघाचे अध्यक्ष वासंती वामन लबडे, ग्राम संघाचे उपाध्यक्ष स्नेहा सुरेश लबडे, ग्राम संघाच्या सीआरपी अस्मिता रुपेश घोडके, महिला मंडळ खानावळे मोठया प्रमाणात उपस्थित होत्या.

यावेळी दारू बंदी नाटकामार्फत जनजागृती, प्रौढ शिक्षण जनजागृती करण्यात आली. कविता गायन कार्यक्रम झाला. यात विविध महिलांच्या आयुष्यावर कवितांचे सादरीकरण झाले. भारतातील विविधराज्य त्याची वेषभूषा करण्यात आली होती.

या सर्व कार्यक्रमांना वावेघर जिल्हा परिषद सदस्य अनन्या गाताडे, पोयंजे पंचायत समिती सदस्य अस्मिता अनंत पाटील, सावळे ग्रामपंचायत सदस्य रश्मी गाताडे, करुणा गाताडे आदी उपस्थित होते.

# पनवेल महापालिकेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त नारी सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिन निमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्या वतीने पनवेल नारी सन्मान २०२६ या भव्य कार्यक्रमाचे आयोजन ९ मार्च २०२६ रोजी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे करण्यात आले होते.

नवनिर्वाचित महापालिका महिला सदस्यांचा सत्कार पनवेल नारी सन्मान २०२६ या भव्य कार्यक्रमांतर्गत महापालिकेच्या नवनिर्वाचित महापालिका महिला सदस्यांचा सत्कार महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला रविनाथ पाटील, अतिरीक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, उपायुक्त मंगला माळवे, सहायक आयुक्त डॉ.रूपाली माने यांच्या हस्ते करण्यात आला.



तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वैद्यकीय, विधी, पत्रकारिता, सामाजिक, विविध उद्योग व्यवसाय, अशा विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या प्रेरणादायी सुमारे ४० कर्तृत्ववान महिलांचा सन्मान यावेळी नवनिर्वाचित महिला सदस्यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला बालकल्याण अधिक्षक कविता मोकल, अधिक्षक, प्रकाश गायकवाड डेएनयुएलमच्या व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात, स्वप्नाली चौधरी, रूपाली चौधरी, प्रियंका पाटील, प्रियंका कोते, महिला बालकल्याण विभागातील कर्मचारी, महापालिका अधिकारी कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुप्रसिध्द निवेदिका शुभांगी पाटील व नुतन पाटील यांनी केले.

सायबर क्राईम नवी मुंबईच्या प्रभारी पोलीस निरीक्षक दिपाली पाटील यांनी आपल्या व्याख्यानात फेक कॉल्स, व्हॉटसॲप व्हेरिफिकेशन, फोटोचा होणारा गैरवापर याबाबत सविस्तर माहिती दिली. राज्यस्तरीय पुरस्कार विजेती कृष्णाई उळेकर हिने 'स्त्री शक्तीचे भारूड' या सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. महापालिका महिला कर्मचारी यांचा विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर करण्यात आला.

खेळ पैठणीच्या कार्यक्रमाचे आयोजन यावेळी करण्यात आले होते. सुत्रसंचलन अभिनेते प्रणव रावराणे यांनी केले. तसेच या रात्रीस खेळ चाले या मालिकेतील वच्छी हे पात्र साकारणारी अभिनेत्री संजीवनी पाटील यांच्या हस्ते विजेत्या महिलांना बक्षीस वितरीत करण्यात आले.

लकी ड्रॉचेही आयोजन करण्यात आले होते. या लकी ड्रॉमधून पाच लकी विजेते काढण्यात आले. यांना विशेष असे बक्षीस यावेळी देण्यात आले. या कार्यक्रमास महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच पालिका कार्यक्षेत्रातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकुणच पनवेल महानगरपालिकेच्या वतीने मोठ्या उत्साहात जागतिक महिला दिनानिमित्त पनवेल 'नारी सन्मान २०२६' कार्यक्रम राबविण्यात आला.

## संपादकीय

# सरकारकडून खबरदारी

मध्य पूर्वेतील युद्धामुळे जागतिक स्तरावर ऊर्जा संकट घोंघावते आहे. आपल्याकडे पुरेसा साठा उपलब्ध असल्याने पेट्रोल-डिझेलच्या किमती लगेच वाढण्याची शक्यता नाही, परंतु एलपीजीच्या आपल्या एकूण मागणीपैकी दोनतृतियांश पुरवठा मध्य पूर्वेतील आयातीवर अवलंबून असल्यामुळे देशातील शहरांमध्ये गॅसचा तुटवडा काहीसा जाणवू लागला आहे. केंद्र सरकारने लागलीच देशातील एलपीजी उत्पादन वाढवण्याचे निर्देश दिले असून घरगुती गॅसच्या पुरवठ्याला प्राधान्य देण्यास सांगितले आहे. काळाबाजार रोखण्यासाठी अत्यावश्यक वस्तू कायदाही लागू केला.

**अमेरिका-इस्रायलच्या इराणवरील संयुक्त कारवाईला अकरा दिवस झाले असून तूर्तास कोणीही माघार घेण्याची चिन्हे नाहीत. इराणचे दिवंगत धर्मगुरू अयातुल्ला खामेनी यांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांचे पुत्र मुजतबा खामेनी यांची निवड जाहीर झाल्यानंतर इराणने इस्रायल आणि आखाती देशांवरील हल्ले तीव्र केले. इस्रायलने इराणच्या तेलविहिरींना लक्ष्य केल्यानेही परिस्थिती चिघळली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत तेलवाहू जहाजांची कोंडी झाल्याने आखाती देशांनी कच्च्या तेलाच्या उत्पादनात कपात केली आहे. असे असले तरी भारतात तूर्त इंधन दरवाढ होणार नसल्याची ग्वाही केंद्र सरकारने दिली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून तेलवाहू जहाजांची वाहतूक मंदावली असल्याने युद्धग्रस्त इराणसह आखाती देशांकडून भारत, दक्षिण कोरिया, चीन आणि जपानला होणारा कच्चे तेल तसेच नैसर्गिक वायूचा पुरवठा खंडित झाला आहे. पुरवठा साखळीच युद्धामुळे खंडित झाल्याने स्वयंपाकाच्या गॅसच्या किंमतीत वाढ झाली आहे. केंद्र सरकारने लागलीच देशातील तेल शुद्धीकरण कारखान्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच गॅस पुरवठ्यात घरगुती एलपीजीच्या पुरवठ्याला प्राधान्य देण्यासही सांगितले आहे. एरव्ही आपली दैनंदिन जगण्याची लढाई लढण्यातच गुंतलेला सामान्य माणूस युद्ध स्वयंपाकघरापर्यंत येऊन पोहोचल्याच्या जाणीवेने धास्तावला आहे. एलपीजीचा तुटवडा भासण्याची शक्यता दिसू लागताच लगेच त्याची साठेबाजी व काळाबाजार सुरू होतो. मात्र हे रोखण्यासाठीही केंद्र सरकारने लागलीच पावले उचलली असून गॅस बुकिंगचा कालावधी वाढवला आहे. यामुळे ग्राहकांकडून घबराटीपोटी होणाऱ्या बुकिंगलाही अटकाव होईल तसेच घरगुती गॅसचा पुरवठा विनाअडथळा सुरू रहावा म्हणून केंद्र सरकारने मंगळवारी 'एस्मा' अर्थात अत्यावश्यक वस्तू कायदाही लागू केला आहे. स्वयंपाकाच्या गॅसची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना सरकारने घरगुती वापराच्या सिलिंडरच्या पुरवठ्याला प्राधान्य देण्यास सांगितले असल्याने त्याचा परिणाम मुंबईतील हॉटेल व्यावसायिकांना मात्र जाणवू लागला आहे. व्यावसायिक वापराच्या सिलिंडरच्या पुरवठ्यावर निर्बंध आल्याने हे हॉटेल व्यावसायिक अडचणीत आले आहेत. अशीच परिस्थिती राहिल्यास लवकरच निम्मी उपाहारगृहे बंद होतील असा अंदाज हॉटेल व्यावसायिकांच्या संघटनेने व्यक्त केला आहे. त्या-त्या हॉटेलजवळील गॅस सिलिंडरच्या उपलब्ध साठ्यानुसार हॉटेल सुरु ठेवायचे की बंद याचा निर्णय हॉटेलमालकांकडून घेतला जाणार आहे. मुंबईतील काही हॉटेल सोमवारपासूनच बंद झाल्याचेही सांगण्यात येते. याचा परिणाम हॉटेल व्यवसायाशी निगडित लोकांच्या उपजीविकेवरही होणार आहे. साठेबाजी रोखण्यासाठी घरगुती एलपीजी सिलिंडर नोंदणीसाठी किमान प्रतिक्षा कालावधी २१ दिवसांवरून २५ दिवसांपर्यंत वाढवण्यात आला आहे. काही उद्योगांमध्येही एलपीजी व एलएनजी हे इंधन म्हणून वापरले जातात. त्यावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, इराण व इस्रायल-अमेरिका यांच्यातील युद्ध सुरू झाल्यावर आखाती देशांमध्ये अडकलेले ६७ हजार भारतीय मात्र सरकारच्या प्रयत्नांमुळे आतापर्यंत मायदेशी परतले आहेत.**

# लोकपरंपरेतील बाईपण ते आत्मभान देणारं आजचं माणूसपण

बाई म्हणे देवा, नको सोन्याचा हार, मान द्यावा जगाने, तोच माझा श्रृंगार या ओवीतील शब्दांतून स्त्रीच्या सन्मानाच्या अपेक्षा पूर्वीपासून वारंवार व्यक्त होताना दिसतात. या अपेक्षापूर्तीसाठी सामाजिक जाणिवेच्या भावनेतून राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना आत्मसन्मान मिळवून देण्याचे प्रयत्न केले आहेत. चूल आणि मुल या चौकटीत अडकलेल्या स्त्रीला आत्मविश्वासाने माणूस म्हणून जगण्याचा हमरस्ता उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया शासनाने सुरू केली. जुन्या लोकपरंपरागत गीतांमधून व्यक्त होणाऱ्या तिच्या कोंडलेल्या श्वासापासून ते लोकशाही व्यवस्थेत तिला मिळालेल्या बळापर्यंतच्या प्रवासावर प्रकाश टाकणारा हा लेख.!!



भारतीय ग्रामीण जीवनाचा विचार केला, तर स्त्रीचे आयुष्य अनेकदा श्रम, जबाबदाऱ्या आणि कुटुंबाच्या अपेक्षांनी वेढलेले दिसते. घर, शेत, कुटुंब आणि नातेसंबंध यांची जबाबदारी सांभाळत ती शांतपणे आयुष्याची वाट चालत होती. बाहेरून पाहताना तिचे जगणे सहनशीलतेचे आणि मूक स्वीकाराचे वाटत असले, तरी लोकपरंपरेच्या अंतरंगात डोकावले की ग्रामीण स्त्रीचे वेगळेच रूप समोर येते. विशेषतः ओव्या, श्रमगीते आणि जात्यावरच्या गाण्यांमध्ये तिच्या मनातील भावना, अनुभव आणि न्यायाची जाणीव स्पष्टपणे व्यक्त होताना दिसते. पूर्वीच्या ग्रामीण जीवनात स्त्रीचा दिवस पहाटेपासून सुरू होत असे. घरातील कामे उरकताना, विशेषतः जात्यावर दळण दळताना स्त्रियांच्या ओठांवरून ओव्या उमटत. दळणाच्या तालासोबत शब्दांची लय जुळत जाई आणि त्या लयीमध्ये तिच्या मनातील भावना व्यक्त होत असत.

जात्यावर दळते मी ज्वारी, माझं मन गेलं माहेरच्या दारी या ओवीतून माहेराविषयीची ओढ आणि सासरीच्या आयुष्याची जाणीव सहजपणे व्यक्त होते. ग्रामीण जीवनात स्त्रीची भूमिका केवळ घरापुरती मर्यादित नव्हती. शेतात निंदणी, कापणी, रोप लावणी यांसारख्या विविध कामांमध्ये स्त्रिया सक्रियपणे सहभागी होत. एकत्र काम करताना त्या गाणी म्हणत आणि त्या गाण्यांतून आपल्या आयुष्याविषयीच्या भावना व्यक्त करत.

निंदणीची ओळ लांब, ऊन माथ्यावरती,बाईच्या जीवाला वेळ कुठे विश्रांती

या ओवीतून स्त्रीच्या कष्टमय जीवनाची आणि तिच्या अखंड श्रमांची जाणीव दिसून येते. लोकपरंपरेतील ओव्यांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्या स्त्रीच्या अनुभवांना आणि विचारांना अभिव्यक्ती देतात. अनेकदा या ओव्यांमधून स्त्री आपल्या आयुष्यातील प्रश्नही मांडताना दिसते.

सासू म्हणे काम कर, नणंद म्हणे ते नको हे कर, या बाईच्या जीवाला बघा कोण विचारं? या ओवीतून घरातील जबाबदाऱ्या पार पाडताना स्त्रीला भेडसावणाऱ्या परिस्थितीचे प्रतिबिंब दिसते.प्रसिद्ध लोकसाहित्य अभ्यासक डॉ. ताराबाई भावळकर यांनी ग्रामीण स्त्रियांच्या ओव्यांचा अभ्यास करताना नमूद केले आहे की, या ओव्या केवळ मनोरंजनासाठी नसून त्या स्त्रियांच्या अंतर्मनातील अनुभवांचे आणि भावविश्वाचे प्रतिबिंब आहेत. ग्रामीण स्त्रीला समाजात उघडपणे बोलण्याची संधी कमी मिळत होती; त्यामुळे ती ओव्यांच्या माध्यमातून आपल्या वेदना, प्रश्न आणि न्यायाची जाणीव व्यक्त करत असे.

आजच्या बदलत्या जीवनशैलीत जात्यावर दळण दळणे किंवा शेतात सामूहिकपणे गाणी म्हणण्याच्या परंपरा कमी झाल्या असल्या तरी या ओव्यांमध्ये जपलेली स्त्रीची संवेदना आणि अनुभव आजही लोकस्मृतीत जिवंत आहेत. लोकपरंपरेतील या ओव्या म्हणजे ग्रामीण स्त्रीच्या आयुष्याचा मौखिक इतिहासच मानता येईल.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने या लोकपरंपरेतील ओव्यांकडे पाहिले, तर स्त्रीच्या वेदनांना अभिव्यक्ती देणारी परंपरा आपल्या समाजात पूर्वीपासून अस्तित्वात असल्याचे दिसून येते. या ओव्या केवळ लोकसाहित्याचा भाग नसून त्या स्त्रीच्या भावना, श्रम आणि आत्मसन्मानाची जाणीव करून देणाऱ्या महत्त्वाचा सांस्कृतिक ठेवा आहेत. आधुनिक काळात बाईपणाला मानवी मूल्य प्राप्त करून देण्यासाठी शासनाने स्त्रियांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी विविध लोकाभिमुख योजना राबवून महिलांना आत्मभान आणि स्वावलंबनाची नवी दिशा दिली. ग्रामीण व शहरी भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून स्वयं-सहाय्यता गटांची चळवळ उभी केली. या गटांमुळे लाखो महिलांना बचत, कर्जसुविधा आणि लघुउद्योगांच्या संधी उपलब्ध झाल्या. महिलांच्या आरोग्य आणि सन्मानाचा विचार करून राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य योजना, मातृत्व सहाय्य योजना तसेच ग्रामीण भागात सुरक्षित प्रसूतीसाठी विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सावित्रीबाई फुले यांच्या नावाने राबविल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक योजना, शिष्यवृत्ती आणि निवासी वसतिगृहे यामुळे अनेक मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान' प्रभावीपणे राबविले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून महिलांचे स्वयं-सहाय्यता गट तयार होऊन बचत, उत्पादन, विपणन आणि लघुउद्योगांना चालना मिळत आहे. यामुळे महिलांना आर्थिक स्वावलंबनासोबतच सामाजिक नेतृत्वाची संधीही मिळू लागली आहे.

याशिवाय महिलांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी राज्य शासनाने सुरू केलेली मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना ही विशेष महत्त्वाची ठरत आहे. या योजनेद्वारे पात्र महिलांना दरमहा आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जात असून त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनातील गरजा भागविण्यास मदत होते. या योजनेमुळे महिलांच्या हातात थेट आर्थिक बळ मिळून त्यांचे आत्मभान आणि स्वावलंबन अधिक दृढ होत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेल्या आरक्षणामुळे महिलांना निर्णय प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळत आहे. त्यामुळे समाजाच्या विकासात महिलांचे नेतृत्वही अधिक प्रभावीपणे पुढे येत आहे. या सर्व उपक्रमांमुळे आजची स्त्री केवळ घरापुरती मर्यादित राहिलेली नाही. ती राजकारण, विज्ञान, उद्योग, प्रशासन, क्रीडा आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आपले कर्तृत्व सिद्ध करत आहे. तिच्या कार्याचा समाजात गौरव होत आहे आणि तिच्या योगदानाला योग्य तो बहुमानही मिळत आहे.

लोकपरंपरेतील ओव्यांतून उमटलेली स्त्रीची न्यायाची जाणीव आणि आत्मसन्मानाची भावना आजच्या लोकाभिमुख शासन व्यवस्थेनी राबविलेल्या विविध योजनामुळे अधिक व्यापक स्वरूपात प्रत्यक्ष परिवर्तीत होऊन पुढे येताना दिसते आहे. लोकपरंपरेतील मूक वेदना, संघर्ष आणि आत्मसन्मानाचा शोध घेत चालणारी स्त्री आज शासनाच्या विविध योजनांच्या बळावर अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वावलंबी बनत आहे.

म्हणूनच लोकपरंपरेतील बाईपणापासून आत्मभानाने उभ्या राहिलेल्या आधुनिक स्त्रीपर्यंतची ही वाटचाल केवळ एका व्यक्तीच्या आयुष्याची कथा नाही; ती महाराष्ट्राच्या सामाजिक प्रगतीची दिशा आहे.

लोकपरंपरेतून उमटलेला तिचा मूक आवाज आज सन्मान, अधिकार आणि समानतेच्या नव्या पर्वात रूपांतरित होत आहे. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून समाजघडणीत आपले योगदान देणारी ही नवी स्त्री आज अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वावलंबी बनत आहे. म्हणूनच नुकत्याच झालेल्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने इतकेच म्हणावेसे वाटते बाईच्या कष्टांना मान, तिच्या स्वप्नांना आकाश, समानतेच्या वाटेवरच समाजाचा खरा विकास.

**-युवराज पाटील,**
**जिल्हा माहिती अधिकारी, पुणे**



## बदलते तंत्रज्ञान

# नवीन ह्युंदाई व्हर्ना लॉन्च; सेफ्टीमध्ये मोठे बदल

ह्युंदाई मोटर इंडियाने आपली लोकप्रिय सेडान 'व्हर्ना' चे नवीन मॉडेल आज ९ मार्च रोजी लॉन्च केले आहे.



याची सुरुवातीची एक्स-शोरूम किंमत १०.९८ लाख आहे. कंपनीने या लक्झरी सेडानमध्ये डिझाइन, तंत्रज्ञान आणि सुरक्षिततेशी संबंधित २५ पेक्षा जास्त मोठे बदल केले आहेत, हे विशेष.

डिझाइन : ब्लॅक क्रोम ग्रिल आणि नवीन अलॉय व्हील्समुळे स्पोर्टी लूक मिळाला


नवीन व्हर्नाच्या एक्सटीरियरमध्ये अनेक कॉस्मेटिक बदल करण्यात आले आहेत. यात आता ब्लॅक क्रोम रेडिएटर ग्रिल, ड्युअल डएऊ प्रोजेक्टर हेडलॅम्प्स आणि नवीन डिझाइनचे फ्रंट व रियर बंपर देण्यात आले आहेत. कारला स्पोर्टी लूक देण्यासाठी १६-इंचचे डायमंड-कट अलॉय व्हील्स लावण्यात आले आहेत. ह्युंदाईने दोन नवीन कलर ऑप्शनही सादर केले आहेत – क्लासी ब्लू आणि टायटन ग्रे मॅट.

कारचे केबिन आता पूर्वीपेक्षा अधिक प्रीमियम आहे. यात ऊ-कट स्टिअरिंग व्हील आणि लेदरेट सीट अपहोल्स्ट्री आहे. ड्रायव्हरची सीट ८-वे इलेक्ट्रिक डजस्टमेंट आणि मेमरी फंक्शनसह येते.फ्रंट पॅसेंजर सीटमध्ये ४-वे इलेक्ट्रिक डजस्टमेंटसह सेगमेंटमध्ये पहिल्यांदाच 'इलेक्ट्रिक वॉक-इन डिव्हाईस' देण्यात आले आहे. मागील खिडकीसाठी सनशेड आणि स्मार्ट ट्रंक यांसारखे फीचर्सही आहेत.

इन्फोटेनमेंट आणि डिजिटल इन्स्ट्रुमेंटेशनसाठी ड्युअल १०.२५-इंच स्क्रीनवायरलेस अँड्रॉइड ऑटो आणि पल कारप्ले,इलेक्ट्रिक सनरूफ,वायरलेस स्मार्टफोन चार्जर, व्हेंटिलेटेड फ्रंट सीट्स, पुश-बटण स्टार्टसह स्मार्ट की

इंजिन आणि पॉवर : दोन पेट्रोल इंजिन पर्यायांसह उपलब्ध असेल. ह्युंदाईने सुरक्षिततेवर खूप भर दिला आहे. नवीन व्हर्नामध्ये ७५ पेक्षा जास्त ॲडव्हान्स्ड सेफ्टी फीचर्स देण्यात आले आहेत, एअरबॅग्स: सेगमेंटमध्ये पहिल्यांदाच सेंटर साइड एअरबॅगसह एकूण ७ एअरबॅग्स आहेत.डॅशकॅम : कारमध्ये इन-बिल्ट डॅशकॅम देखील मिळते, जे या सेगमेंटमध्ये पहिल्यांदाच आहे. इतर फीचर्स : सराउंड व्ह्यू मॉनिटर, ब्लाइंड-स्पॉट मॉनिटर आणि रेन-सेन्सिंग वायपर्स.

# भारतीय क्रिकेटपटू विजय हजारे



## निमित्त

विजय हजारे यांचा जन्म मराठी कुटुंबात ११ मार्च १९१५ रोजी झाला. हजारे यांचे क्रिकेटमध्ये आगमन होत असताना, त्यांना हिंदू जिमखान्याकडून क्रिकेट खेळण्यासाठी प्रस्ताव आला होता. सुरुवातीस त्यांनी तो प्रस्ताव नाकारला, पण त्यावेळचे क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष डी' मेलो यांनी त्यांची समजूत काढली आणि हजारे प्रथमश्रेणी क्रिकेट खेळले.

हजारे हे उजव्या हाताने फलंदाजी आणि उजव्या हाताने मध्यमगती गोलंदाजी करीत असत. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये २३८ सामने ते खेळले. यामध्ये त्यांनी ५८.३८च्या सरासरीने १८,७४० धावांचा पाऊस पाडला. या प्रथमश्रेणी क्रिकेटमधील हा भारतीय धावांचा विक्रम प्रथम सुनील गावसकर आणि नंतर सचिन तेंडुलकर यांनी मोडला. प्रथमश्रेणीत त्रिशतक करणारे हजारे हे पहिले भारतीय होते. त्यांनी 'द हिंदूज' विरुद्ध १९४३-१९४४मध्ये ३०९ धावा ठोकल्या होत्या. यामध्ये त्यांची सर्वोच्च धावसंख्या नाबाद ३१६ आहे. अशाप्रकारे त्यांनी प्रथमश्रेणी सामन्यात दोन त्रिशतके झळकावली.


प्रथमश्रेणीत ६० शतके आणि सलग तीन कसोटींमध्ये शतक नोंदवणारे ते पहिले भारतीय होते. त्यांनी गुल मोहंमद यांच्यासमवेत १९४७मध्ये ५७७ धावांची भागीदारी केली होती. ती भागीदारी २००६मध्ये श्रीलंकेच्या कुमार संघकारा आणि महेला जयवर्धने यांनी साउथ आफ्रिकेविरुद्ध ६२४ धावा करून मोडली. कसोटी क्रिकेट खेळत असताना विजय हजारे यांनी ३० कसोटींमध्ये ४७.६५ च्या सरासरीने २१९२ धावा केल्या. यामध्ये त्यांची नाबाद १६४ ही सर्वोच्च धावसंख्या आहे. कसोटीमध्ये गोलंदाजी करताना त्यांनी ६१ च्या सरासरीने २० बळी घेतले. यामध्ये त्यांची ४/२९ ही सर्वोत्तम गोलंदाजी आहे.

कर्णधार नसताना हजारे यांनी अनेक प्रशंसनीय खेळ्या केल्या. यामध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यात १९४७-४८मध्ये एडिलेड कसोटीत दोन्ही डावात झळकावलेल्या शतकांचा समावेश आहे. १९५१मध्ये इंग्लंडविरुद्धच्या मायदेशातील मालिकेसाठी हजारेंकडे कर्णधारपद सोपवण्यात आले. त्यांनी दिल्लीतील पहिल्या कसोटी सामन्यामध्ये नाबाद १६४ धावांची दमदार खेळी केली. ही धावसंख्या त्यावेळी भारताकडून नोंदवलेली सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या होती. भारतीय क्रिकेटमधील अनेक विक्रमांचे प्रणेते असलेल्या हजारेंनी कर्णधार म्हणून पहिल्याच कसोटीत शतक झळकावण्याचा मानही पहिल्यांदा मिळवला. विजय हजारे यांच्याच नेतृत्वाखाली भारताने पहिला कसोटी विजय मिळवला.

हजारे हे मितभाषी असल्यामुळे, भारताने पहिला कसोटी विजय मिळवल्यानंतरही ते आपल्या सहकारी खेळाडूंना फक्त 'शाब्बास' म्हणाले. सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर यांच्या पूर्वी भारतीय क्रिकेटमध्ये अनेक विक्रम करणारे हजारे हे पहिले भारतीय होते. त्यामुळे त्यांना आद्य भारतीय विक्रमादित्य असेच म्हणावे लागेल. पद्मश्री किताब मिळवणारे पहिले भारतीय क्रिकेट खेळाडू विजय हजारे यांची इनिंग कर्करोगाच्या दीर्घ आजारानंतर १८ डिसेंबर २००४ रोजी वडोदरा येथे संपली.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# 'ही' हिरवीगार भाजी महिलांसाठी फायदेशीर

आपल्या आरोग्यासाठी हिरव्यागार भाजी या नेहमीच फायदेशीर ठरतात. कोणत्याही प्रकारचे आजार दूर ठेवण्यासाठी आहारात भाजी असणे आवश्यक आहे. यामध्ये वाल अथवा पावटा ही एक अशी भाजी आहे जी विशेषतः महिलांच्या आरोग्यासाठी उत्तम ठरते. याचे आरोग्यदायी फायदे जाणून घ्या.



बाकलाची भाजी अर्थात फावा बीन्समध्ये प्रोटीन, फायटो न्यूट्रिएंट्स, कॉपर, अमिनो ॲसिड, विटामिन बी, फायबर आणि मॅग्नेशियम असे अनेक पोषक तत्व आढळतात. शरीराला आवश्यक मिनरल्स देण्याचे काम ही भाजी करते. काही जण यांच्या पानांची भाजीदेखील करतात. रिजेन्सी हॉस्पिटल लखनौमधील डाएटिशियन रितु त्रिवेदी यांनी ही भाजी खाण्याचे फायदे सांगितले आहेत, जाणून घ्या.

गरोदरपणात होतो फायदा : बाकलाची भाजी अर्थात फावा बीन्सचे सेवन गरोदर असणाऱ्या महिलांसाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. यामध्ये कॅल्शियम, लोह आणि मॅग्नेशियम अधिक प्रमाणात असून गरोदर महिलांसाठी उपयोगी ठरते. यामध्ये फोलेट असून बाळाच्या मानसिक विकासासाठी आणि हाडांचा चांगला विकास होण्यासाठी याचा फायदा मिळतो.

ॲनिमियापासून बचाव : फावा बीन्सच्या नियमित सेवनामुळे शरीरातील रक्ताची कमतरता कमी होते आणि ॲनिमियाची लक्षणे कमी होतात. वास्तविक यामध्ये लोहाचे प्रमाण अधिक प्रमाणात असल्यामुळे शरीरामध्ये हिमोग्लोबिनचा स्तर वाढण्यास मदत मिळते. याच्या नियमित सेवनाने शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते.

ब्रेस्ट कॅन्सरपासून ठेवते दूर : डाएटिशियननुसार, पावट्याचे दाण्यांमध्ये कॅन्सरशी लढणारे पोषक तत्व आढळतात. याच्या सेवनामुळे महिलांचा ब्रेस्ट कॅन्सरपासून बचाव करणे अधिक सोपे होते. फावा बीन्समध्ये जास्त प्रमाणात विटामिन बी आणि विटामिन डी आढळतात, जे ब्रेस्ट कॅन्सरशी लढण्यास मदत करतात.

साखर नियंत्रणात आणण्यास मदत : हेल्थलाईनने दिलेल्या अहवालानुसार, फावा बीन्स खाल्ल्याने साखर रक्तात वाढण्याचा धोका कमी होतो कारण यामध्ये अधिक प्रमाणात अँटीडायबिटीक गुण असतात. तसंच फावा बीन्समध्ये विसिने आणि डिविसीन नावाचे घटक याला अँटीडायबिटीक बनवते.

# माणगाव पंचायत समिती सभापतीपदी शिवसेनेचे विलास शिंदे

## उपसभापतीपदी ज्ञानदेव पदरत यांची चर्चा





**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पंचायत समितीवर शिवसेनेचा भगवा फडकला असून सभापती व उपसभापतीपदासाठी बुधवार, दि.११ मार्च रोजी निवडणूक होत असून या पदांसाठी शिवसेनेचे पाटणूस पंचायत समिती गणातून निवडून आलेले सदस्य विलास शिंदे हे सभापतीपदी, तर वडवली पंचायत समिती गणातून निवडून आलेले ज्ञानदेव पदरत हे उपसभापतीपदी विराजमान होणार असल्याचे समजते.

माणगाव पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी झाली होती. या निवडणुकीत ८ पैकी ५ जागांवर शिवसेना शिंदे गटाचे पंचायत समिती सदस्य निवडून येऊन शिवसेनेने या पंचायत समितीवर एकहाती सत्ता प्राप्त केली आहे. या ठिकाणी राज्यात महायुतीत सत्तेवर असणारे शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हे दोन्ही पक्ष एकमेकांविरुद्ध लढले. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष तथा खा.सुनील तटकरे व राज्याचे रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांनी हि निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची केली होती. यामध्ये मंत्री भरत गोगावले यांनी बाजी मारून त्यांनी माणगाव पंचायत समितीवर ८ पैकी ५ जागांवर शिवसेनेचे सदस्य निवडून आणून पुन्हा एकदा माणगाव पंचायत समितीवर शिवसेनेचा भगवा फडकविला.आज बुधवारी माणगाव पंचायत समिती सभापती,उपसभापती पदासाठी निवडणूक होत आहे.

या दोन्ही पदांसाठी बुधवार दि.११ मार्च रोजी सकाळी ११ ते दुपारी १ यावेळेत महाराष्ट्र भूषण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती माणगाव येथे नामनिर्देशन पत्र दाखल करणे,दुपारी २ वा. सभापती,उपसभापती पदांसाठी पंचायत समिती सदस्यांची बैठक, दुपारी २ वा. बैठक सुरु झाल्यानंतर नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे, नामनिर्देशन पत्रांची छाननी पूर्ण झाल्यानंतर १० मिनिटांनी उमेदवारी मागे घेणे, अनुक्रमांक ५चे कामकाज पूर्ण झाल्यानंतर १० मिनिटांनी आवश्यक्ता असल्यास सभापती पदासाठी निवडणूक घेणे,अनुक्रमांक ६चे कामकाज पूर्ण झाल्यानंतर १० मिनिटांनी आवशक्यता असल्यास उपसभापतीपदासाठी निवडणूक घेणे असा निवडणुकीचा कार्यक्रम निवडणुकीचे प्राधिकृत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी माणगाव डॉ.संदीपान सानप यांनी जाहीर केला आहे. माणगाव पंचायत समितीवर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा भडकल्याने शिवसैनिक आनंदित दिसत असून शिवसैनिकांनी विजयी जल्लोषाची जोरदार तयारी केली असल्याचे समजते.

# डबल गॅस सिलिंडरसाठी रोह्यात धावाधाव

### पुरवठा सुरळीत; ग्राहकांनी संभ्रम ठेवू नये -अधिकारी



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील अनेक गॅस सिलेंडर ग्राहकांमध्ये सध्या गॅस खरेदीबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून गॅस मिळणार नाही या भीतीमुळे नागरिकांची गॅस वितरक कार्यालयांकडे धावाधाव सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराण-इस्रायल युद्धाचे सावट असल्याने खनिज तेल व गॅस पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे भारतात, विशेषतः महाराष्ट्रात एलपीजी सिलिंडरचा तुटवडा निर्माण होईल अशी अफवा पसरल्याने ग्राहकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

तसेच सिलेंडर बुकिंगमध्ये तांत्रिक अडचणी, घरगुती सिलेंडरसाठी २५ दिवसांची अनिवार्य मर्यादा आणि दरवाढीच्या चर्चेमुळेही नागरिकांमध्ये संभ्रम वाढला आहे. त्यामुळे रोहा तालुक्यात अनेक ग्राहक डबल सिलेंडर मिळवण्यासाठी गॅस वितरकांच्या कार्यालयात गर्दी करत असल्याचे दिसून येत आहे. काही ग्राहकांनी भविष्यात सिलेंडर मिळेल की नाही या भीतीने आधीच अतिरिक्त सिलेंडरची सोय करून ठेवली असल्याची माहितीही समोर येत आहे.

दरम्यान, तालुक्यातील काही ठिकाणी अनधिकृत पद्धतीने चढ्या भावाने सिलेंडर विक्री होत असल्याच्या तक्रारी देखील पुढे येत आहेत. त्यामुळे काही ग्राहकांना अधिक पैसे मोजून सिलेंडर घ्यावा लागत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. याबाबत रोहा तालुका अन्न व नागरी पुरवठा अधिकारी हेमलता कुरसुंगे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, ग्राहकांनी कोणत्याही संभ्रमात पडू नये. शासनाकडून गॅस पुरवठा बंद किंवा कमी करण्याबाबत कोणतेही अधिकृत पत्र जारी करण्यात आलेले नाही. सध्या गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. ग्राहकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. मात्र नियमानुसार २५ दिवसांनंतरच पुढील सिलेंडर बुकिंग करता येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, भारत गॅसचे पुरवठा ठेकेदार जमिल अधिकारी यांनी सांगितले की, कंपनीमार्फत गॅसचा पुरवठा काही प्रमाणात कमी प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्यामुळे डबल सिलेंडर किंवा कमर्शियल सिलेंडर तत्काळ उपलब्ध होणार नाहीत. कंपनीकडून मिळालेल्या सूचनांनुसारच वितरण केले जात आहे. ग्राहकांनी बुकिंग केल्यानंतरच नियमानुसार सिलेंडर दिला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

एकंदरीत, अफवांमुळे ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असला तरी प्रशासनाने नागरिकांनी घाबरून न जाता नियमांनुसारच सिलेंडर बुकिंग करण्याचे आवाहन केले आहे.

# थकबाकीविरोधात रायगडात महावितरणची धडक मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

वीजबील वेळेत भरले नाहीत तर तुमच्यावर अंधारात राहण्याची वेळ येवू शकते. वीज सेवा सुरळीतपणे पुरवूनही अनेक ग्राहकांकडून वेळेवर वीजबिलाचा भरणा होत नसल्याने महावितरण कंपनीच्या महसुलावर ताण येत आहे. थकीत बिलांची वाढती रक्कम लक्षात घेता महावितरणने कडक कारवाई करीत गेल्या चार महिन्यांत ३० हजार ३७१ ग्राहकांच्या वीजजोडण्या खंडित केल्या आहेत.

रायगड सर्कल अंतर्गत अलिबाग, पनवेल, रोहा आणि गोरेगाव हे चार विभाग असून, त्याअंतर्गत १७ उपविभाग कार्यरत आहेत. दर महिन्यातील वापरानुसार ग्राहकांना बिल वितरित केले जाते. दरम्यान, काही ग्राहकांकडून सातत्याने बिल भरण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे दिसून आले आहे.

महावितरणचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली नोव्हेंबरमध्ये ९ हजार ९६५ डिसेंबरमध्ये ६ हजार २८६, जानेवारीमध्ये ६ हजार ६५० आणि फेब्रुवारीमध्ये ७ हजार ५८० अशा एकूण ३० हजार ३७१ ग्राहकांच्या वीजजोडण्या बंद करण्यात आल्या. नागरिकांनी वेळेवर बिल भरून सहकार्य करावे, असे आवाहन बिक्कड यांनी केले.

**वीजचोरांकडून ४३ लाखांची दंडवसुली**

महावितरणने विशेष मोहीम राबवून ३२४ प्रकरणे उघडकीस आणली. यामध्ये ९९ लाख रुपयांचा दंड आकारला आहे. त्यापैकी ७२ जणांनी ४३ लाखांचा भरणा केला असून, उर्वरित २५२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. काही ग्राहक स्वतः विरुद्ध कारवाई टाळण्यासाठी न वटणारे धनादेश देत महावितरणची दिशाभूल करीत जाणूनबुजून वेळ वाया घालवत आहेत. महावितरण अशा ग्राहकांवर कडक कारवाईचा इशारा भांडूप परिमंडलचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी दिला.

# विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांची रसायनी पोलीस ठाण्याला भेट

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कोकण परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी रसायनी पोलीस ठाण्याला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी पोलीस ठाण्याचे वार्षिक निरीक्षण केले आणि कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी त्यांच्यासोबत रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक डॉ. आंचल दलाल, जिल्हा पोलीस उपअधीक्षक अभिजित शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल उपस्थित होते.यावेळी रसायनी पोलिसांनी कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ ऑचल दलाल, जिल्हा पोलिस उप अधीक्षक अभिजित शिवथरे यांना परेड करुन सलामी देत स्वागत केले.

या निरीक्षण प्रक्रियेत खालापूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, रसायनीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, खोपोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिरे, चौक पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल पवार आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव यांच्यासह अन्य पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी संजय दराडे यांनी पोलीस ठाण्यातील नोंदी, शस्त्रागार आणि परिसराची पाहणी केली. तसेच कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने उपस्थित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

वार्षिक निरीक्षणाच्या निमित्ताने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रसायनी पोलीस दलाच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.



# महावितरणच्या लाचखोर अभियंत्याला अटक

**चौक :** चौक येथील महावितरणचे कनिष्ठ अभियंता योगेश देसाई यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे.महावितरणचे ठेकेदार यांच्या तक्रारीवरून त्यांना अटक करण्यात आली आहे. चौक येथील त्यांच्या कार्यालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावला होता. ठेकेदार यांची देयक देण्यास उशीर व अन्य कारणासाठी पैशांची मागणी करण्यात आली होती,अशी माहिती समोर आली आहे.

# ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारकांना लाभासाठी अर्जाचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या ८० वर्षे व त्यावरील निवृत वेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतन, कुटूंब निवृत्तीवेतनात वाढ करण्यासाठी जन्मदाखला, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र, पारपत्र, बँक खाते असलेल्या बँक शाखा प्रमुखाचे प्रमाणपत्र, शासकीय निमशासकीय आस्थापनांचे प्रमाणपत्र, सेवा पुस्तकातील नोंद, ओळखपत्र, सेवानिवृत्त झालेल्या कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र, वाहन परवाना,भारतीय जीवन विमा कंपनी अथवा अन्य विमा कंपनी यांच्याकडील पॉलिसी इत्यादी (यापैकी कोणताही एक पुरावा) कोषागार कार्यालयात सादर करण्यात यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी दीपक बोडके यांनी केले आहे.

८० वर्षे व त्यावरील लाभ मिळण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालयात अर्ज सादर करण्यात यावा तसेच अर्जामध्ये बँकेचे नाव, खाते क्रमांक, पीपीओ क्रमांक नमूद करावा. वयाचा पुरावा सोबत जोडण्यात यावा.

Smt. V. R Hangargekar Judge
नि ९/ड
ने.ता 11/3/2026
Adv. Vishal V. Jaju
Exh. No.

## PUBLIC NOTICE

**IN THE COURT OF LD. CIVIL JUDGE SENIOR DIVISION, PANVEL, AT PANVEL.**

**CMA NO. of 2025**

**MR. PRAVIN LAXMIDAS SAMPAT** )
Age:-64 years, Occupation:- Business ) Applicant
Add: Room No. 3, Mariwala Bhatia Niwas, Sunflower Compound, Rajawadi Road No. 2, Ghatkopar East, Mumbai-400077 )

V/s

**MRS. DHARA MIHIR KAMDAR** )
Age: 35 years, Occupation: Service )
Add: Flat No. 902, Building No. C-2, 9th Floor, Neelyog Apartment, Gaurishankar Wadi, Pantnagar, Ghatkopar (E), Mumbai-400075 )

**MR. JESAL PRAVIN SAMPAT** )
Age:- 30 years, Occupation: Business )
Add: Room No. 3, Mariwala Bhatia Niwas,Sunflower Compound, Rajawadi Road No. 2, Ghatkopar East, Mumbai-400077 ) .Opponents

**That Late MRS. SHARMILA PRAVIN SAMPAT** who expired on 24th January 2024 (hereinafter referred to as Deceased) Room No. 3, Mariwala Bhatia Niwas, Sunflower compound, Rajawadi Road No. 2, Ghatkopar East, Mumbai- 400077 is the wife of the Applicant **MR. PRAVIN LAXMIDAS SAMPAT and mother of Opponent No. 1 MRS. DHARA MIHIR KAMDAR and Opponent No. 2 MR. JESAL PRAVIN SAMPAT.**

The Property description in the name of deceased herewith is: Flat No. B/104,1 Floor, B wing, Tricity Pearl CHSL, Plot No. 14, Sector-21, Ulwe, Navi Mumbai along with shares bearing No. 331 to 340 (both inclusive) amounting to Rs. 50/- each of Tricity Pearl CHS Ltd., Ulwe

Whereas the abovenamed applicant has filed Misc. Application for Heirship Certificate under Bombay Regulation Act 1827 Regulation No. VIII the Court of L.D. CIVIL JUDGE SENIOR DIVISION, AT PANVEL, DIST-RAIGAD

You the member of public are hereby given notice to appear in the Court of L.D. CIVIL JUDGE SENIOR DIVISION, at PANVEL, DIST-RAIGAD in person or by pleader duly instructed and to file your Say, Objections if any within 30 (Thirty) days from the date of publication of this public notice failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under my hand and seal on this 04 day of 02 2026

**Sd/-**
**Jr. Cleark**

**Sd/-**
**By order Assit. Supt.**
**C.J.S.D. Panvel**


## ड्रायव्हर पाहिजे

**फॉर्च्युनर कार साठी ड्रायव्हर पाहिजे**

१०२, सी-विंग, साक्षी पार्क-२, शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र)

माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई-४१०२०६

संपर्क
मोबाईल : ८१०८४००२१४
Email : ekanathpatil4141@gmail.com


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend 27 / 25-26 RFX 7000039147 | Supply and installation of all in one PC at various locations under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 16,72,502.71 |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee : Rs. 500/- + GST Submission of bids from 06.03.2026 to 20.03.2026 up to 11:00 hrs, Opening date:- 20.03.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer(Adm) Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे - बोर्ले, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं. / हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३८ | ०-०८-३० ( पोट खराब्यासह) | ०.६९ | १) जनाबाई रामचंद्र पाटील<br>२) पुष्पाबाई रामचंद्र पाटील<br>३) शैला रामचंद्र पाटील<br>४) हनुमंत रामचंद्र पाटील<br>५) हिराबाई रामचंद्र पाटील<br>६) हिरामण रामचंद्र पाटील<br>७) हौसाबाई रामचंद्र पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०९/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे - बोर्ले, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं. / हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३६ | ०-०९-०० ( पोट खराब्यासह) | ०.२२ | १) जनाबाई रामचंद्र पाटील<br>२) पुष्पाबाई रामचंद्र पाटील<br>३) शैला रामचंद्र पाटील<br>४) हनुमंत रामचंद्र पाटील<br>५) हिराबाई रामचंद्र पाटील<br>६) हिरामण रामचंद्र पाटील<br>७) हौसाबाई रामचंद्र पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०९/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-नेरे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन -**

**मौजेः नेरे, तालुका- पनवेल, जिल्हा- रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकाराणी रु.पै. |
|---|---|---|---|---|
| नेरे | १) अनंत माया गायकर रा.- नेरे, ता. पनवेल, जि. रायगड | २४० | ०.३७.००<br>०.०२.००<br>०.३९.००<br>पैंकी<br>०.१९.०० | ७.५६ |
| | | | **एकुण** | **०.१९.००** |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांकः १०/०३/२०२६**

**सही/-**
**ॲड. सरिता महेंद्र साखरे**
**पत्ता- प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं. ४ नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६**

# रबाळे पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन


## १४ जणांवर गुन्हे दाखल | नाकाबंदी करून वाहनांची तपासणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील रबाळे पोलिसांनी सोमवारी कोम्बिंग ऑपरेशन राबवले. अचानक पोलीस धडकल्याने अवैध धंदे करणाऱ्यांची पळताभुई झाली. या उपक्रम दरम्यान १४ जणांवर विविध कलमांतर्गत गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. यात एक फरार आरोपीही पोलिसांच्या हाती लागला आहे.

शुक्रवारी एपीएमसी पोलिसांनी राबवलेल्या कोम्बिंग ऑपरेशन मुले अनेक गुन्हे समोर आले असून अमली पदार्थ विक्री प्रकरणी एक नायझेरियन अटक करण्यात आला तर तीन संशयित बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेत त्यांची चौकशी सुरू आहे.

एपीएमसी पाठोपाठ आता रबाळे पोलिसांनी सोमवारी कोम्बिंग ऑपरेशन राबवले. या ऑपरेशनपूर्वीच पोलिसांनी संशयित ठिकाणांची पाहणी करून ठेवली होती. त्यानुसार हे कोम्बिंग ऑपरेशन नोसिल नाका, अर्जुनवाडी, घणसोली साईनाथ वाडी व रबाळे परिसरात राबविण्यात आले. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे पोलीस उपायुक्त पंकज डहाणे (परिमंडळ-१) यांच्या मार्गदर्शनाखाली रबाळे पोलीस स्टेशन हद्दीत विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले.





मोहिमेत परिमंडळ १ मधील ७ पोलीस स्टेशनमधील ४ पोलीस निरीक्षक, १६ सहाय्यक पोलीस निरीक्षक व १८४ पोलीस अंमलदारांनी सहभाग घेतला. नशा मुक्त नवी मुंबई धोरणानुसार अमली पदार्थ विक्री व सेवन करणारे गुन्हेगार, अवैध दारू विक्री, गुटखा विक्री, जुगार क्लब अशा अवैध धंद्यांवर एकाच वेळी धाड टाकून करून कठोर कारवाई करण्यात आली.

यावेळी अवैध बांगलादेशी व नायजेरियन नागरिकांची तपासणी, फरारी व पाहिजे आरोपींचा शोध, हॉटेल व लॉजेस मधील संशयास्पद व्यक्तींची तपासणी, नाकाबंदी करून वाहन तपासणी तसेच वॉरंट बजावणी अशा विविध कारवाया करण्यात आल्या.

एक आरोपी कडून एक देशी कट्टा व दोन राऊंड जप्त करण्यात आले तसेच त्यांचेकडून ब्राउन शुगरच्या १०० चिट्ठ्या मिळून आल्या त्याच्यावर आर्म ऍक्ट व अमली पदार्थविरोधी कायदा अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

> **कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान एकूण १४ आरोपींविरुद्ध विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अवैध धंद्यांविरोधातील झिरो टॉलरन्स धोरणानुसार पुढील काळात अशा प्रकारच्या कॉम्बिंग मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार आहेत.**
> **-बाळकृष्ण पाटील,**
> वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रबाळे

# बॉयफ्रेंडने ब्लॉक केले म्हणून प्रेयसीची वाशी खाडीत उडी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आणि मुंबईला जोडणाऱ्या वाशी खाडी पुलावरून एका युवतीने आत्महत्या करण्यासाठी खाडीत उडी मारली, मात्र काही मच्छीमारांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तातडीने पाण्यात उडी मारून तिला वाचवले. जीव वाचवल्यावर उडी का मारली अशी विचारणा केल्यावर तिने दिलेले उत्तर ऐकून उपस्थितानी डोक्यावर हात मारून घेतला.

या मुलीच्या बॉयफ्रेंडने तिला ब्लॉक केले होते. त्यामुळे संपर्क तुटल्याने तिला नैराश्य आले आणि म्हणून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे तिने सांगितले. नवी मुंबई आणि मुंबईला जोडणाऱ्या रेल्वे खाडी पूल आणि रस्ता खाडी पुलावरून दरवर्षी किमान १५ ते २० जण खाडीत उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात. सुदैवाने या ठिकाणी मच्छीमारांचा वावर असल्याने त्यातील बहुतांश लोकांना जीवाची बाजी लावून मच्छीमार वाचवतात. असाच प्रकार मंगळवारी घडला. सकाळी सव्वा आठच्या सुमारास एका विशीच्या युवतीने खाडीत उडी मारली. तिच्या पाठीवर सॅक असल्याने ती थेट बुडाली नाही तर काही वेळ तरंगत राहिली. त्यात तिला थोडेबहुत पोहता येत असल्याने तिने हात पाय मारणे सुरू केले.

परिसरात मच्छीमारी करणाऱ्या वाशी गावातील महेश सुतार यांना कोणीतरी उडी मारली असल्याचे लक्षात आले. त्यांनी लगेच हातपाय मारणाऱ्या मुलीच्या दिशेने बोट वळवली. आणि पाण्यात उतरून तिला वाचवले. दरम्यान, याबाबत वाशी पोलिसांना माहिती दिल्याने वाशी पोलीसही घटनास्थळी धडकले. मुलीला बाहेर काढून तिला बोलते करीत मच्छीमारांनी तिची चौकशी केली असता ती मुंबईची असल्याचे समोर आले.

काही दिवसांपूर्वी तिचे आणि तिच्या मित्राचे वाद झाले. त्यातून तिच्या मित्राने तिचा मोबाईल क्रमांक ब्लॉक केला. त्यामुळे मित्राशी संपर्क होत नव्हता. त्यात ब्लॉक केल्याचे तिने मनाला लावून घेतले व त्यातून नैराश्य आले. वाशीच्या दिशेने लोकल येत असताना खाडी संपताच वाशी रेल्वे स्टेशन असल्याने पुलावर लोकलचा वेग खूप कमी होत असतो. हीच संधी साधून तिने खाडीत उडी मारली होती.

याबाबत अधिक माहिती देताना वाशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी सांगितले की, सव्वा आठ वाजता युवतीने उडी मारली. सुदैवाने तिला वाचवले गेले असून तिची वैद्यकीय तपासणी करून तिला पालकांच्या स्वाधीन करण्यात येणार आहे.

# महिला दिनानिमित्त मोफत आरोग्य शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

श्री सेवा प्रतिष्ठान आणि श्री सेवा महिला मंडळाच्या वतीने भाजप नगरसेविका शैला जगदीश पाटील यांच्या माध्यमातून जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सानपाडा विभागातील नागरिकांसाठी रविवारी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास गरजू रुग्णांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



या कार्यक्रमाला माजी खासदार संजीव नाईक, मनपा गटनेते सागर नाईक यांनी कार्यक्रमाला भेट देऊन उपस्थित महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाच्या आयोजिका शैला जगदीश पाटील, नगरसेविका शिल्पा राजेश ठाकूर, माजी नगरसेवक बाळाराम पाटील, माजी नगरसेविका सुनंदा बाळाराम पाटील, तन्वी सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा जयश्री दंडवते, जगदीश पाटील, भालचंद्र पाटील, आनंत पाटील, दत्ता पाटील, दिगंबर पाटील, गणेश कमळे, अर्जुन नाईक, अम्बूबाई दळवी आदी उपस्थित होते.

यावेळी सानपाडा विभागात राहणाऱ्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना हिरकणी पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच यावेळी नगरसेविका शैला पाटील यांच्या माध्यमातून स्व. पांडुरंग बाळा पाटील सामाजिक संस्था आणि डी.वाय. पाटील रुग्णालय व संशोधन केंद्र यांच्या सहकार्याने दर महिन्याला सानपाड्यातील रहिवाशांसाठी महिन्यातून एक दिवस मोफत ओ.पी.डी सेवा देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

# श्री समर्थ सांप्रदायातर्फे वृक्षाचे संवर्धन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री समर्थ सांप्रदायाच्यावतीने खालापूर, पनवेल तालुक्यातील श्री सेवा दास्यभक्ती श्री समर्थ बैठकीच्या वतीने खारपाडा येथील डोंगराल भागात असणाऱ्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालय जिते आरटीओ हद्दीत शेकडो विविध जातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.



या वृक्षांचे जतन, संवर्धन व्हावे यासाठी समर्थ सांप्रदायाच्यावतीने कोन श्री समर्थ बैठकीच्या अंतर्गत येणाऱ्या मोहोपाडा श्री समर्थ बैठक, आपटा श्री समर्थ बैठक, चांभार्ली श्री समर्थ बैठक, भाताण श्री समर्थ बैठक, तुराडे श्री समर्थ बैठक व आसपासच्या श्री समर्थ बैठकीच्यावतीने दासभक्तांनी हातात फावडे, कुदळ, कोयता, विळा, पाऱ्याचे ड्रम घेवून शेकडो सदस्यांनी लागवड केलेल्या झाडांभोवती वाढलेले गवत काढणे व परिसरात स्वच्छता अभियान राबविताना पहावयास मिळाले.

यावेळी जांभूळ, पेरु, वड, आंबा, बदाम, उंबर, शिसव, कडुलिंब, चिंच, कांचन, पिंपळ, आशी, करंज, भेंड, गुलमोहर, काजू, कुडा, सिताफळ, सप्तकर्णी, जाफल, हिरडा, सावर आदी जातीच्या वृक्षांभोवतालची स्वच्छता करण्यात आली आहे.

या वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी खालापूर, पनवेल तालुक्यातील श्री सदस्य हजर होते. कोणी वृक्षाभोवती आल्या करत, कोणी गवत कापत, शेणखत टाकत तर कोणी पाणी आणून वृक्षांच्या बुंध्यावर टाकत, तर कोणी वृक्षाला आधार देण्यासाठी कुंपण करत असे दृष्य पहावयास मिळाले.

# शेलघर येथे आज यमुना स्त्री सन्मान पुरस्कारांचे वितरण

**उरण : बातमीदार**

कला, क्रीडा, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय अशा समाजाशी निगडित विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांना गेल्या अकरा वर्षांपासून 'यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थे'तर्फे 'यमुना स्त्री सन्मान' पुरस्कार दिला जातो.

हा समारंभ बुधवारी (दि.११) उलवे नोड येथे शेलघर येथील सुखकर्ता बंगल्याच्या गार्डनवर होणार आहे. आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या मातोश्री दिवंगत यमुनाबाई तुकाराम घरत यांच्या नावाने हा पुरस्कार दिला जातो. यंदा पुरस्काराचे बारावे वर्षे आहे. त्यामुळे विविध क्षेत्रांतील १२ महिलांना या वेळी गौरविण्यात येईल. त्यात नवी मुंबईच्या नवनिर्वाचित महापौर सुजाता पाटील, पनवेलच्या उपमहापौर प्रमिला पाटील, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर अशा राजकीय क्षेत्रांत भरारी घेणाऱ्या महिलांचाही समावेश आहे.

पुरस्कार समारंभाच्या निमित्ताने माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर सुमारे ११ वर्षांनंतर एकाच व्यासपीठावर येणार आहेत. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे युवा अध्यक्ष शिवराज मोरे, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, मुंबई पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, तसेच सिनेअभिनेत्री सायली संजीव उपस्थित राहणार आहेत.

# बिर्ला कार्बनकडून प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना प्रमाणपत्र

**मोहोपाडा, रसायनी, चौक : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील बिर्ला कार्बन इंडियाच्या युनिटने सिएसआर उपक्रमांतर्गत प्रशासन हॉल, बिसिआय परिसरात महिला दिवसाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात सुमारे १७५ महिलांनी भाग घेतला.

लोटस हॉस्पिटल, कामोठे येथील तज्ञ डॉ. पारूल साठे या प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थित महिलाना आरोग्य आणि स्वच्छतेवर यावर सखोल मार्गदर्शन केले. राजकीय क्षेत्रात आपली प्रतिभा उमटणाऱ्या यशस्वी महिला व माजी जिल्हा परिषद सदस्य पद्मा पाटील तसेच विद्यमान ननिर्वाचित पंचायत समिती खालापूर सदस्य गौरी गडगे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. तसेच वैद्यकीय क्षेत्रातील नामांकित महिला व्यक्तिमत्त्व डॉ. स्वरांजली गायकवाड यांनीदेखील महिलांना आरोग्यविषयक माहिती दिली.



वनविभाग अधिकारी चौक कल्पना यांनीदेखील उपस्थित राहून महिलांचे मनोबल वाढविले. महिला शिक्षक प्रतिनिधी म्हणून अंजली परदेशी मुख्याध्यापिका या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र कुमार रघुवंशी युनिट हेड बिर्ला कार्बन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड पाताळगंगा यांनी केले.

कंपनी प्रशासनाच्या वतीने पुणिंदो कुमार, रवींद्र कुमार, शिरोडकर, सचिन कंदले हे उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्राचे सूत्रसंचालन सिएसआर विभाग प्रमुख लक्ष्मण मोरे व हरीश रावत यांनी केले. भारत सरकारच्या कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत विविध कोर्स पूर्ण केलेल्या १२० महिलांना शाश्वत उपजीविका प्रशिक्षण प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

# महिलांना रोजगार उपलब्ध करून देणार -महापौर सुजाता पाटील

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक महिला दिनानिमित्त नवी मुंबई पालिकेच्या वतीने विष्णुदास भावे नाट्यगृह येथे झालेल्या विशेष समारंभावेळी नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण म्हणजेच खऱ्या अर्थाने स्त्री सक्षमीकरण असल्याचे सांगत या पुढील काळात महानगरपालिका क्षेत्रातील महिलांना विविध माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देऊन आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरणावर भर देण्यात येईल, असे स्पष्ट केले.



या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या एनएमएमटी अर्थात नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमात पहिल्या टप्प्यात ४०० महिला भगिनींना बस चालक या पदावर रुजू करण्याच्या अनुषंगाने पावले उचलण्यात येत असल्याचे महापौर सुजाता पाटील यांनी जाहीर केले. या करिता महिलांना बस चालकाचे संपूर्ण प्रशिक्षण देण्याची जबाबदारी समाजविकास विभागावर देण्यात आली असून या विभागाच्या माध्यमातून प्राधान्याने नवी मुंबईत वास्तव्य असणाऱ्या महिलांना प्राधान्य दिले जाणार आहे.

या माध्यमातून स्त्री सक्षमीकरणाचे नवे दालन नवी मुंबईत खुले होणार असून प्रत्येक बाबतीत आघाडीवर असणाऱ्या नवी मुंबईच्या उपक्रमांचे अनुकरण इतरही शहरात होईल असा विश्वास महापौर सुजाता पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# करावे गावात महिला दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ नवी मुंबई संस्थेने ज्ञानदीप हायस्कूल करावेगाव येथे नगरसेविका रेखा म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली ६ मार्च २०२६ रोजी महिला दिन कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमात गाणी, नृत्य, कविता, मनोगते सादर करण्यात आली.

यावेळी नगरसेविका संतोषी म्हात्रे, माजी न्यायाधीश चंदा नाथानी, लेखिका पाकिजा आत्तार, नवरंगचे अध्यक्ष गज आनन म्हात्रे, कार्यवाह घनश्याम परकाले, उपाध्यक्ष अनिल मुनघाटे आणि मान्यवर उपस्थित होते.

# ६ एप्रिलला नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. मार्च महिन्याच्या लोकशाही दिनामध्ये प्राप्त अतिक्रमण विभागाशी निगडीत १ अर्जदाराच्या निवेदनावर आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी प्रत्यक्ष सुनावणी घेतली आणि तत्पर कार्यवाहीचे आदेश दिले.

एप्रिल महिन्याचा लोकशाही दिन २ जून एप्रिल २०२६ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये २० मार्च २०२६पर्यंत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्य www.nmmc.gov.in या संकेतस्थळाच्या (Website) मुख्यपृष्ठावर जलद दुवे आयकॉनवर उपलब्ध असून ती अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से. १५ ए, किल्ले गांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथेही प्रत नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे.

अर्ज करताना नागरिकांनी शासन निर्णयानुसार अर्जात नमूद तक्रार/निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे याची दखल घ्यावयाची आहे. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपिल, सेवाविषयक-आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावयाची आहे.

# उरणमध्ये महाराजस्व समाधान शिबिर

**उरण : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या छत्रपती महाराजस्व समाधान अभियानाचा पहिला टप्पा उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत येथे उरण मंडळातर्फे पार पाडण्यात आला.

अभियानात शासनाच्या विविध योजना, दाखले, शासन निर्णय यांची माहिती देण्यात आली. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेत जाऊन दाखल्यांचे अर्ज प्राप्त करून घेतले होते. शिबिरात विविध विभागांचे स्टॉल्स लावण्यात आले होते. यामध्ये ६८ लाभार्थ्यांना उत्पन्न, जात, अधिवास आणि नॉन - क्रिमिलेयर दाखल्यांचे व ५३ व्यक्तींना डिजिटल ७/१२ आणि ८ जणांना ८ - अ उताऱ्याचे वाटप करण्यात आले.



संजय गांधी योजना २० पात्र अर्जदारांना मंजुरी आदेश देण्यात आले. तर २५ जणांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन १२ जणांची आभा कार्ड नोंदणी करण्यात आली. याशिवाय नवीन आणि दुय्यम शिधापत्रिकांचे वाटपासह भूमि अभिलेख विभागाच्या वतीने फेरफार बाबत माहिती देण्यात आली.

यावेळी अविषकुमार सोनोने उपजिल्हाधिकारी भुसंपादन अविषकुमार सोनोने, उरणचे तहसीलदार डॉ.उद्धव कदम, नायब तहसीलदार महसूल रविंद्र सानप, नरेश पेडवी संजय गांधी योजना नायब तहसीलदार नरेश पेढवी, माजी सभापती ॲड. सागर कडू, अजय म्हात्रे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी सुधीर चव्हाण उपस्थित होते.

# रसायनीत महिला दिनानिमित्त वॉकेथॉनसह प्लास्टिकबंदीचा संदेश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त बिर्ला कार्बन इंडिया प्रा. लि., पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच साहस फाउंडेशन रसायनी यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा परिसरात महिलांसाठी वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. ही वॉकेथॉन मोहोपाडा येथील अचानक मैदान येथून सुरू होऊन वृंदावन फ्लोरा सोसायटी, चांभार्ली येथे समाप्त झाली.

या वॉकेथॉनमध्ये परिसरातील सुमारे १३० ते १४० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेतील विजेत्यांमध्ये प्रथम क्रमांक निलम जोशी, द्वितीय अनिता तांतरे, तृतीय इप्सिता सामल तसेच ५० वर्षांवरील महिला गटामध्ये प्रथम क्रमांक - निर्मला शेटिगर यांनी मिळवला.

यावेळी प्लास्टिक बंदी आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी सहभागी महिलांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण गोविंद जाधव यांची विशेष उपस्थिती होती. तसेच पोलिस उपनिरीक्षक मनोज महाडिक, रेश्मा कुरूप, दीपिका भंडारकर आदी महिलांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.



# पाली प्रबुद्ध नगरमध्ये नाल्याचे काम रखडले

## घाणीसह दुर्गंधीचे साम्राज्य; रहिवाशांचे आरोग्य धोक्यात

**पाली : प्रतिनिधी**

येथील प्रबुद्ध नगर परिसरात सुरू असलेल्या मुख्य नाल्याचे काम गेल्या चार महिन्यांपासून कासवगतीने सुरू असल्याने स्थानिक रहिवाशांना भीषण नरकयातना सहन कराव्या लागत आहेत. नोव्हेंबर महिन्यात सुरू झालेले हे काम फेब्रुवारी महिना संपला तरी अद्याप पूर्ण झालेले नाही. या अर्धवट कामामुळे सांडपाण्याचा निचरा होत नसून परिसरात दुर्गंधी आणि डासांचे साम्राज्य पसरले आहे.

येथील स्थानिक रहिवाशांनी सांगितले की प्रबुद्ध नगरमधील मुख्य नाल्याच्या बांधणीचे काम प्रशासकीय संमतीने सुरू करण्यात आले होते, मात्र ठेकेदाराच्या संथ कारभारामुळे हे काम गेल्या चार महिन्यांपासून रेंगाळले आहे. सध्या या उघड्या आणि अर्धवट नाल्यात मोठ्या प्रमाणात कचरा साठला असून सांडपाणी साचून राहत आहे. साचलेल्या पाण्यावर डास, कीटक आणि जीवजंतूंचा प्रचंड फैलाव झाला असून, याचा सर्वाधिक फटका लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना बसत आहे.

परिसरातील सांडपाण्याची व्यवस्था कोलमडल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांची भीती निर्माण झाली आहे. वारंवार तक्रार करूनही कामाची गती वाढत नसल्याने या परिस्थितीला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल आता रहिवासी विचारत आहेत. या रखडलेल्या कामामुळे स्थानिक नागरिकांच्या जगण्याचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.



**नोव्हेंबरपासून या नाल्याचे काम सुरू आहे, पण चार महिने उलटूनही ते पूर्ण झालेले नाही. अपूर्ण कामामुळे येथून वाट काढताना येत नाही. तसेच साचलेल्या घाणीमुळे प्रचंड दुर्गंधी आणि डासांचा त्रास सहन करावा लागतोय. घाण साचल्यामुळे लहान मुले आणि ज्येष्ठांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासनाने आणि संबंधित ठेकेदाराने हे काम त्वरित पूर्ण करावे, अन्यथा नागरिकांच्या आरोग्याला काही बरे-वाईट झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्यात यावी.**

**-सुगंधा परेश जाधव, रहिवासी, प्रबुद्ध नगर, पाली**

**नाल्याचे काम पूर्ण करण्यासंदर्भात ठेकेदारासोबत बोलणं झाला आहे. काही दिवसातच नाल्याच्या राहिलेल्या कामास सुरुवात करून काम पूर्ण करण्यात येईल.**

**-सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, नगरपंचायत, पाली**

# भाजपचे कृष्णा पारंगे होणार खालापूर पं.स.चे सभापती

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती म्हणून भारतीय जनता पक्षाचे नेते कृष्णा गंगाराम पारंगे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून, खालापूर पंचायत समितीवर महायुतीचा झेंडा फडकणार आहे.



नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत खालापूर पंचायत समितीवर तीन भारतीय जनता पक्ष, दोन शिवसेना, दोन शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि एक अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस असे बलाबल असून महायुतीचा झेंडा फडकला आहे. भाजप तीन आणि शिवसेना दोन असे बहुमत आहे. येथे शिवसेना आणि भाजप महायुती होती. तरीही केवळ कृष्णा गंगाराम पारंगे यांचे नाव सभापती म्हणून आल्याने त्यांना बिनशर्त पाठिंबा देण्यात येईल, अशी राजकीय चर्चा विरोधक यांच्यात आहे. कृष्णा गंगाराम पारंगे हे सर्वात मोठी ग्राम पंचायत वासंबेचे माजी सरपंच होते, राजकारण आणि प्रशासन या दोन्ही चा दांडगा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे.

सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते म्हणून त्यांचा उल्लेख होत आहे. एक प्रभावशाली नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. गेली पंचवीस वर्षे शिवसेनेची एकहाती सत्ता होती, परंतु शिवसेनेच्या अंतर्गत वादाने २०१७ साली शिवसेना पराभूत झाली. त्यानंतर २०२६मध्ये महायुतीचा झेंडा फडकणार आहे.

यापूर्वी त्यांच्या पत्नी कांचन पारंगे याही खालापूर पंचायत समितीच्या सभापती होत्या. लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेंद्र थोरवे यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत.

# रायगडात जागतिक महिला दिनानिमित्त विविध उपक्रम

## रोहा येथे सन्मान नारीशक्तीचा कार्यक्रम

**रोहा : प्रतिनिधी**

पंचक्रोशी जंगम समाज रोहा महिला मंडळाच्या वतीने रोहा शासकीय विश्रामगृह येथे आयोजित सन्मान नारीशक्तीचा कार्यक्रम झाला.



यावेळी रोहा अष्टमी नगर परिषद नगराध्यक्ष वनश्री शेडगे, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, डॉ. अपूर्वा क्षिरसागर, पंचक्रोशी जंगम समाज अध्यक्ष लक्ष्मण जंगम, महिला अध्यक्ष प्रिया जंगम, उपाध्यक्ष प्रतीक्षा जंगम, सचिव सुखदा जंगम, सहसचिव स्मिता जंगम, खजिनदार ऋतुजा जंगम, सहखजिनदार रुपाली जंगम, सल्लागार अस्मिता जंगम, सल्लागार विद्या जंगम, सदस्य विजया सरसंबे, सारिका जंगम, स्नेहल जंगम, रुचिता जंगम आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते शिक्षिका प्रणाली जंगम, उद्योजिका कविता जंगम, परिचारिका निधी जंगम, उद्योजिका तन्वी जंगम, शिक्षिका साक्षी जंगम अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. यावेळी सत्कारमुर्ती प्रणाली जंगम व साक्षी जंगम यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुत्रसंचालन सुखदा जंगम, ऋतुजा जंगम, स्मिता जंगम यांनी केले. आभार प्रतिक्षा जंगम यांनी मानले.

## महिलांची रक्त तपासणी

**चौक : प्रतिनिधी**

लाईफ केअर डायग्नोस्टीक चौक यांच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून महिलांची रक्त तपासणी करण्यात आली.

प्रत्येक स्त्री अनेक भूमिका बजावते मुलगी, आई, बहीण, व्यावसायिक, अनेक क्षेत्रांशी निगडीत काम करताना, इतरांची काळजी घेताना, स्वतःची काळजी घ्यायला विसरते, तिला तिची आठवण करून देण्यासाठी निरोगी महिला, निरोगी जग! या संकल्पनेवर आम्ही आमच्या लॅब च्या वतीने रक्त तपासणी केली, असे संचालक सुहास पाटील यांनी सांगितले.

CBC सीबीसी (संपूर्ण रक्त गणना), RBS आरबीएस (साखर चाचणी), थायरॉईड प्रोफाइल (T3, T4, TSH) या रक्त तपासणी करण्यात आल्या, याचा लाभ अनेक महिलांनी घेतला.



## स्मिता आंबवणेंनी जिंकली पैठणी

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत चौक यांनी आयोजित केलेल्या खेळ पैठणीचा कार्यक्रमात स्मिता संजय आंबवणे यांनी पैठणी जिंकली. ग्रुप ग्रामपंचायत चौक यांच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून महाकांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



महिला सक्षमीकरण, महिला आरोग्य, बचत गटाच्या माध्यमातून कार्यक्रम, विविध क्षेत्रात महिलांसाठी करिअर मार्गदर्शन असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात सुमारे पाचशे महिलांनी उपस्थिती लावली होती. प्रश्न उत्तर कार्यक्रमात स्मिता संजय आंबवणे यांनी स्पर्धा जिंकून पैठणी जिंकली. अनिशा चौधरी यांनीही पारितोषिक जिंकले. कार्यक्रमाचे आयोजन सरपंच रितू ठोंबरे व उप सरपंच पूजा हातमोडे यांनी सदस्या यांच्या मदतीने कार्यक्रम यशस्वी केला.

## जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये महिलांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन त्यांच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन देण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मंजिरी पाटील यांनी महिलांना स्वतःच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात स्वच्छता राखणे, संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व तसेच नियमित आरोग्य तपासणी का आवश्यक आहे याबाबत त्यांनी उपस्थित महिलांना मोलाची माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली.

या आरोग्य शिबिरात अनेक महिलांची तपासणी करण्यात आली व त्यांना आवश्यक त्या आरोग्यविषयक सूचना देण्यात आल्या. तसेच उपस्थित महिलांना मोफत सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे महिलांमध्ये स्वच्छता व आरोग्याबाबत सकारात्मक संदेश पोहोचला.

हा उपक्रम उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्वला भालचंद्र चंदनशिव, संस्थेचे सचिव व माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, तसेच संस्थेचे खजिनदार डॉ. नितीन गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. त्यांच्या प्रेरणेमुळे जागतिक महिला दिन समाजोपयोगी व अर्थपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला.

## ब्राह्मण मंडळातर्फे व्याख्यान

**रोहा : प्रतिनिधी**

ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने श्री ओंकारेश्वर मंदिर येथे विविध उपक्रम झाले. यावेळी पवई -मुंबई येथील प्रसिद्ध व्याख्यात्या तसेच प्रतिथयश साहित्यिक चैत्राली जोगळेकर यांचे आयुष्य जगा भरभरून या महिलांच्या अत्यन्त जिव्हाळाच्या विषयावरील व्याख्यान महिलांना एक नवीन बूस्टर देऊन गेले.

यावेळी ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे साहित्यिक क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या ब्राह्मण समाजातील अचला धारप, आरती धारप, मानसी चापेकर, सायली जोगळेकर यांचा चैत्राली जोगळेकर यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी महिलांसाठी घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आली त्याचे परीक्षण सुमेधा आठवले व सुवर्णा खेर्डे यांनी केले.

उपक्रम यशस्वी होण्यासाठी ब्राह्मण मंडळ रोहाचे अध्यक्ष अमित आठवले, सचिव निखिल दाते यांच्या मार्गदर्शनाखाली ब्राह्मण मंडळ रोहा कार्यकारिणी सदस्या स्वाती पेंडसे, स्मृती जोशी, राजश्री आठवले व महिला कमिटीने विशेष परिश्रम घेतले.



## मोरे कॉलेजच्या विद्यार्थिनींना स्वसंरक्षण प्रशिक्षण



**रोहा : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त डीएमसीसी कंपनीतर्फे ग्रामपंचायत रोठ (बु) कार्यालय येथे सोमवारी आयोजित स्वसंरक्षण प्रशिक्षणात एम.बी. मोरे कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

विद्यार्थिनींचे सशक्तीकरण, त्यांच्यात आत्मविश्वास आणि समाजातील त्यांच्या भूमिकेबाबत जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. कार्यशाळेत विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षणाचे काही मूलभूत प्रकार शिकविण्यात आले. यासोबतच पौष्टिक आहार आणि निरोगी जीवनशैली याबाबतही विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी महाविद्यालयाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

रोठ (बु) ग्रामपंचायतीतील या कार्यक्रमात माजी सरपंच श्री नितीन वारंगे आणि डीएमसीसी कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. एम.बी. मोरे कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा साक्षी गिजे, प्रा. ऋतुजा पवार, प्रा. प्रियांका घुले आणि ५७ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

## मजगाव येथील मराठी शाळेत आंतरराष्ट्रीय महिला दिन

**मुरुड : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करून महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पूजा भोईर व मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ मॅडम यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले.

मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ, सहशिक्षिका स्वप्नाली बाजी यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी बाळासाहेब फुंदे, चेतन चव्हाण, संतोष दहातोंडे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा पूजा भोईर, उपाध्यक्ष केतन नाकती, उपाध्यक्ष निखिल मानाजी, देवेन गोयजी, मिथून भोईर, महिला सदस्या, विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रथमेश म्हात्रे, माता पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन हर्षा नांदगावकर यांनी केले तर आभार स्वप्नाली बाजी यांनी मानले.



## धावीर वेलनेस सेंटरतर्फे महिला दिन



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा येथील कुणबी भवन हॉलमध्ये धावीर वेलनेस सेंटरच्या महिला दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महिलांनी कार्यक्रमास उपस्थित राहून प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमास नगराध्यक्ष वनश्री शेडगे, सभापती निता हजारे, उपसभापती गौरीताई बारटक्के, नगरसेविका प्रियंका धनावडे, सुप्रिया जाधव, समिधा आष्टीकर, प्रतिभा कोंडे आणि धावीर वेलनेस सेंटर आरोग्य सल्लागार ज्योती पवार उपस्थित होत्या.

यावेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी कुटुंबातील महिला निरोगी असेल तर आपले कुटुंब देखील निरोगी राहते आणि आपला समाजदेखील निरोगी राहतो. म्हणून तुम्ही तुमच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. हल्ली रोजच्या धकाधकीच्या जीवनात महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. महिलांनी व्यायाम आणि आहार या दोन्ही गोष्टींकडे लक्ष देणे गजेचे आहे.

रोह्यातील महिलाना महत्त्व पटवून दिलं की स्वतःची काळजी घेण ही स्वतःची जबाबदारी आहे. मी आपल्या कार्यक्रमाच्या व्हिडीओ आणि रिल्स नेहमी बघत असते असे यावेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी सांगितले.

या कार्यक्रमात धावीर वेलनेस सेंटरच्या आरोग्य सल्लागार ज्योती पवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

## अ‍ॅड. पूजा सुर्वे यांचा सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पळसदरी ग्रामपंचायत मधील तिघर येथे जिल्हा परिषद शाळेत महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कायदेशीर सल्लागार म्हणून कार्य करणाऱ्या अ‍ॅड. पूजा सुर्वे यांचा यावेळी निपुण सखी म्हणून सन्मान करण्यात आला.

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तिघर येथे जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेचे शिक्षक जनार्दन पजई, कांचन देशमुख, आशा देशमुख आदी उपस्थित होत्या. या कार्यक्रमात समाजात कायदेशीर सल्लागार म्हणून कार्य करणाऱ्या अ‍ॅड. पूजा सुर्वे यांचा सन्मान करण्यात आला. कांचन देशमुख यांनी महिलांना मार्गदर्शन केले तर आशा देशमुख यांनी काव्यात्मक सादरीकरण केले.

## महिलांना मोफत सॅनिटरी नॅपकिन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत इको-फ्रेंडली व बॉडी-फ्रेंडली सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे महिलांना आरोग्य व स्वच्छतेबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन देण्यात आले.



या कार्यक्रमाला उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या कार्यक्रम व्यवस्थापक ममता म्हात्रे तसेच नेहा गायकवाड उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना मासिक पाळीदरम्यान स्वच्छतेचे महत्त्व, योग्य सॅनिटरी नॅपकिनचा वापर आणि आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत माहिती दिली.

या उपक्रमामुळे महिलांमध्ये स्वच्छता व आरोग्याबाबत सकारात्मक संदेश पोहोचला. हा उपक्रम उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला भालचंद्र चंदनशिव, संस्थेचे सचिव व माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, तसेच संस्थेचे खजिनदार डॉ. नितीन गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

# बीसीसीआयकडून विश्वविजेत्या भारतीय संघाला १३१ कोटींचे बक्षीस



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकपच्या फायनलमध्ये न्यूझीलंडला धूळ चारून तिसऱ्यांदा विश्वचषकावर नाव कोरणाऱ्या भारतीय संघासाठी बीसीसीआयने आपला खजिना उघडला आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी टीम इंडियासाठी १३१ कोटी रुपयांच्या भव्य इनामी रक्कमेची घोषणा केली आहे. ही रक्कम २०२४मधील बक्षीसापेक्षाही मोठी आहे.

अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव केल्यानंतर, भारताने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केलेल्या स्पर्धेच्या बक्षीस रकमेची रक्कम २.३४ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स (२१.५ कोटी रुपये) मिळवले आहेत, तर उपविजेत्या न्यूझीलंडला १.१७ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स (१०.७५ कोटी रुपये) मिळाले. टीम इंडियाला या व्यतिरिक्त बीसीसीआयची रक्कम मिळणार आहे.

२०२४मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघाने विश्वचषक जिंकला तेव्हा तत्कालीन सचिव जय शाह यांनी १२५ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. यंदा ही रक्कम १३१ कोटी रुपयांवर नेण्यात आली आहे. बीसीसीआयने जाहीर केलेली ही रक्कम केवळ खेळाडूंसाठीच नाही, तर संपूर्ण टीम मॅनेजमेंटसाठी आहे.

# आयसीसीचा वर्ल्डकप संघ जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेची सांगता झाल्यावर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आपल्या सर्वोत्तम प्लेइंग इलेव्हनची घोषणा केली आहे. या संघात संजू सॅमसनसह चार भारतीय खेळाडूंना स्थान मिळाले आहे, पण भारतीय संघाला विक्रमी जेतेपद मिळवून देणाऱ्या सूर्यकुमार यादवची या संघात वर्णी लागलेली नाही.

आयसीसीने दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्कमच्या नेतृत्वाखालील सर्वोत्तम संघ निवडला आहे. भारताच्या संजू सॅमसनसह ईशान किशन, हार्दिक पांड्या आणि जसप्रीत



बुमराह या चौघांचा समावेश आहे. पाच डावात ३२१ धावांसह टीम इंडियाला जेतेपद मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या संजूला सलामीवीर यष्टीरक्षकाच्या रूपात संधी देण्यात आली आहे. त्याच्या जोडीदाराच्या रूपात आयसीसीने पाकिस्तानच्या साहिबजादा फरहानची निवड केली आहे. त्याने यंदाच्या वर्ल्डकपमध्ये सहा डावात सर्वाधिक ३८३ धावा केल्या आहेत. टी-२० वर्ल्डकपच्या इतिहासात एका हंगामात कोणत्याही फलंदाजाने केलेली ही सर्वोच्च धावसंख्याही ठरली.

ईशान किशन याने यंदाच्या

### संजूसह भारताच्या चौघांचा समावेश; सूर्याला स्थान नाही

हंगामात ३१७ धावा केल्या. सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो चौथ्या स्थानावर राहिला. त्यामुळे तिसऱ्या क्रमांकाच्या बॅटरच्या रूपात आयसीसीने त्याला आपल्या संघात घेतले आहे. याशिवाय हार्दिक पांड्याला सर्वोत्तम अष्टपैलूच्या रूपात या संघात स्थान देण्यात आले आहे. पांड्याने दोन अर्धशतकासह यंदाच्या हंगामात नऊ विकेट्स घेतल्याचे पहायला मिळाले.

जसप्रीत बुमराहने आठ सामन्यात १४ विकेट्सचा डाव साधत यंदाच्या हंगामात संयुक्तरित्या सर्वाधिक विकेट्स घेतल्या. त्याला आयसीसीच्या संघात स्थान देण्यात आले आहे.

**संघ :** साहिबजादा फरहान (पाकिस्तान), संजू सॅमसन (भारत, यष्टीरक्षक बॅटर), ईशान किशन (भारत), एडन मार्करम (द.आफ्रिका, कर्णधार), हार्दिक पांड्या (भारत), विल जॅक्स (इंग्लंड), जेसन होल्डर (वेस्ट इंडिज), जसप्रीत बुमराह (भारत), लुंगी एनिग्डी (द.आफ्रिका) आदिल राशिद (इंग्लंड), ब्लेसिंग मुजरबानी (झिम्बाब्वे), शॅडली वॅन शॉकविक (अमेरिका, बारावा खेळाडू).



## खो-खो प्रीमियर लीगमध्ये मेढा संघ विजेता

**धाटाव : प्रतिनिधी**

जय बजरंग क्रीडा मंडळाच्या वतीने मेढा येथील मैदानावर आयोजित रोहा खो-खो प्रीमियर लीग २०२६ स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत तालुक्यातील अनेक नामांकित संघांनी सहभाग घेत दमदार सामने खेळत प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले. स्पर्धेला क्रीडाप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली.

या स्पर्धेत अवचितगड मेढा-रोहा फायटर्स संघाने दमदार कामगिरी करत अंतिम सामन्यात विजय मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. एसएनएस स्पोर्ट्स-रोहा चॅलेंजर्स संघाने द्वितीय, श्री भैरवनाथ यशवंतखार-रोहा वॉरियर्स संघाने तृतीय आणि ओम साई राम-रोहा लिजेंड्स संघाने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. याशिवाय महिला खो-खो सामन्यात सह्याद्री शक्ती संघाने प्रथम, तर कोकण पॉवर संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.

स्पर्धेत उत्कृष्ट रक्षण प्रतीक जंगम (अवचितगड मेढा), उत्कृष्ट आक्रमक राज देशमुख (एसएनएस स्पोर्ट्स) व रूद्र मांडलेकर (श्री भैरवनाथ यशवंतखार), तर उत्कृष्ट कर्णधार ओंकार मालुसकर (ओम साई राम) व अक्षय मोरे (अवचितगड मेढा) ठरले. विजेत्या संघांसह उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना वैयक्तिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## मॅथ्यू हेडन गुजरात टायटन्स संघाच्या फलंदाजी प्रशिक्षकपदी



> चांगली फलंदाजी प्रतिस्पर्धी संघाला दबावात आणते, पण फलंदाजीतील सर्वोत्तम दर्जा सामना जिंकून देतो. गुजरात टायटन्सच्या संघाला त्याच स्तरावर नेण्यासाठी प्रयत्नशील असेन.
>
> **-मॅथ्यू हेडन**

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगच्या आगामी हंगामासाठी शुबमन गिलच्या गुजरात टायटन्स संघाने मोठा निर्णय घेतला आहे. ऑस्ट्रेलिया आणि चेन्नई सुपर किंग्जचा माजी सलामीवीर फलंदाज मॅथ्यू हेडन याची फ्रँचायझी संघाने फलंदाजी प्रशिक्षकाच्या रूपात नियुक्ती केली आहे.

मॅथ्यू हेडन यांनी २००८ ते २०१० या कालावधीत चेन्नई सुपर किंग्जचे प्रतिनिधित्व केले आहे. २००९मध्ये ऑरेंज कॅप पटवणारा ऑस्ट्रेलियन दिग्गज निवृत्तीनंतर समालोचकाच्या रूपात आयपीएलशी कनेक्ट असल्याचे पहायला मिळाले होते. आता हा दिग्गज प्रशिक्षकाच्या रूपात गुजरातच्या संघाला फलंदाजीचे धडे देताना दिसणार आहे.

गत हंगामात गुजरात टायटन्सचा संघ तिसऱ्या स्थानावर राहिला. एलिमिनेटरमध्ये मुंबई इंडियन्सच्या संघाने त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला होता. हार्दिक पांड्याने पदार्पणाच्या हंगामात संघाला जेतेपद मिळवून देत इतिहास रचल्यावर आता या संघाचे नेतृत्व शुबमन गिलकडे आहे. तो सध्याच्या घडीला वनडे आणि कसोटीत टीम इंडियाचाही कॅप्टन आहे. त्यात आता मॅथ्यू हेडन या दिग्गजाच्या अनुभवाची भर पडली आहे.

आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत हेडन मॅथ्यू यांनी ऑस्ट्रेलियासाठी २७३ सामने खेळले आणि १५ हजारांहून अधिक धावा केल्या आहेत. ते क्रिकेट जगतातील सर्वात प्रभावी सलामीवीरांपैकी एक होते. अनेक आयसीसी स्पर्धांमध्ये ऑस्ट्रेलियाच्या यशात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांची आक्रमक पण तांत्रिकदृष्ट्या मजबूत फलंदाजी शैलीने व्हाईट-बॉल क्रिकेटमधील पॉवरप्ले फलंदाजीची पद्धतच बदलली. हेडन आता मुख्य प्रशिक्षक आशिष नेहरासोबत कोचिंग स्टाफमध्ये दाखल होणार आहेत.

## गॅरी कर्स्टन श्रीलंकेचे नवे प्रशिक्षक

**कोलंबो : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेनंतर श्रीलंकन संघाला नवा कोच मिळाला आहे. भारतासह संयुक्त यजमानपदाखाली पार पडलेल्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील संघाच्या निराशनजक



कामगिरीनंतर सनथ जयसूर्या यांनी मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला होता. श्रीलंकन बोर्डाने त्यांच्या जागी आता भारताला वर्ल्ड चॅम्पियन करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेच्या गॅरी कर्स्टन यांची संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड केली आहे.

यंदाच्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत श्रीलंकन संघाला सुपर-८ फेरीपर्यंतही मजल मारता आली नव्हती. संघाच्या लाजिरवाण्या कामगिरीनंतर जयसूर्या यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. आता १५ एप्रिलपासून कर्स्टन श्रीलंकन क्रिकेट संघासोबतचा आपल्या नव्या इनिंगची सुरुवात करतील. २०२७च्या वर्ल्डकप स्पर्धेपर्यंत ते श्रीलंकन क्रिकेट संघासोबत असतील, असा उल्लेखही श्रीलंकन क्रिकेट बोर्डाने आपल्या निवेदनात केला आहे. यंदाच्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत ते सल्लागाराच्या रूपात नामीबियाच्या संघासोबत होते.

## पंच तुषार सिनलकर यांचा जागतिक तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये सहभाग

**रसायनी : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय पंच (क्योरुगी आणि पूमसे) आणि ४ डॅन ब्लॅक बेल्ट तुषार सिनलकर यांनी काठमांडू येथे झालेल्या प्रतिष्ठित माउंट एव्हरेस्ट जागतिक तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये पंच म्हणून यशस्वीरित्या काम पाहिले.




जागतिक तायक्वांदोने मान्यता दिलेल्या या जी-१ मानांकित स्पर्धेत अनेक देशांतील अव्वल क्रमांकाचे खेळाडू सहभागी झाले होते. पंच सिनलकर यांनी उत्तम कामगिरी आणि अचूकतेने आपली कर्तव्ये पार पाडली आणि स्पर्धेदरम्यान त्यांच्या उत्कृष्ट पंचगिरीबद्दल आयोजक आणि अधिकाऱ्यांकडून कौतुकाची थाप मिळाली.

अलिकडेच सिनलकर यांनी व्हिएतनाममधील हो ची मिन्ह सिटी येथे आयोजित जागतिक तायक्वांदो आंतरराष्ट्रीय रेफरी रिफ्रेशर कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला, जिथे त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आणि जागतिक तायक्वांदोच्या अद्ययावत नियमांसह आंतरराष्ट्रीय रेफरी म्हणून त्यांची ओळख आणखी मजबूत केली.

याबद्दल इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर, महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनचे अध्यक्ष संदीप ओंबासे, सचिव गफ्फार पठाण आणि कोषाध्यक्ष डॉ. प्रसाद कुलकर्णी यांनी सिनलकर यांचे अभिनंदन केले.

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, ULWE**

CBSE Affiliation No. 1131483 School Code: 31472 UDISE No. 27244100042

Plot No. 01 & 02, Sector-12, Ulwe, Tal. - Panvel, Dist. - Raigad - 410206.

Contact No. 022-27212067, 77100072762,

Email: rtpsulwe@gmail.com, Website: www.rtpsulwe.com

**STAFF RECRUITMENT**

Applications are invited for the following positions for appointment in the Academic Year 2026-27

As our institution continues to grow, we are seeking passionate and dedicated educators who are committed to inspiring young minds and contributing to our vision of academic excellence.

| POST & SUBJECT | No. of position | QUALIFICATIONS & ELIGIBILITY |
|---|---|---|
| Primary Coordinator | 1 | ▪Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks ▪Bachelor of Education (B.Ed.) is Mandatory ▪3 Years of relevant experience in a CBSE school is preferred ▪Graduation or Post Graduation in Physics is preferred |
| Teacher cum Assistant Co-ordinator (Pre-Primary) | 1 | ▪ Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks ▪ Bachelor of Education (B.Ed.) or Early Childhood Care & Education(E.C.C.Ed.) is Mandatory 3 Years of experience in a CBSE school is preferred |
| TGT English (1) | 1 | ▪Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks ▪Bachelor in Education (B.Ed.) is mandatory ▪Prior teaching experience in a CBSE school is mandatory ▪CTET (Central Teacher Eligibility Test) qualification is preferred |
| PRT English (1) Science (1) Social Science (1) | 3 | ▪Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks ▪Bachelor in Education (B.Ed.) is mandatory ▪Prior teaching experience in a CBSE school is preferred ▪CTET(Central Teacher Eligibility Test) qualification is preferred |
| Dance Teacher | 1 | ▪Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks ▪Bachelor of Performing Arts (Dance) or (B.P.A.) Dance |
| Art & Craft Teacher | 1 | ▪Graduate or Post-Graduate with a minimum of 50% marks ▪A.T.D./ B.F.A./ M.F.A./ Diploma in Fine Art/Painting /Drawing & painting |
| Music Teacher | 1 | ▪Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks ▪Sangeet Visharad or BA in Music followed by a 2 Years Diploma/Certificate in Music |
| Librarian | 1 | ▪Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks ▪B.LIB / M.LIB is mandatory ▪3 Years of experience in a CBSE school is preferred |


Note: To apply, interested candidates should submit their resume/cv, a passport-sized photograph and self-attested copies of all relevant documents (Academic credentials). Applications can be sent via post to the Chairman, JBSP Sanstha, Ramsheth Thakur Public School, Ulwe at Plot No. 01 & 02, Sector-12, Ulwe, Navi Mumbai - 410206. Alternatively, applications may be submitted by email to rtpsulwe@gmail.com

The deadline for all submissions is Monday, 23rd March, 2026.

For Additional Information Contact:7710072762 / 7710090800

Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)

Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel



## कुलदीप यादव होणार विवाहबद्ध

**मसुरी : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाने फायनल जिंकत विक्रमी तिसऱ्यांदा टी-२० वर्ल्डकप स्पर्धा जिंकली. वर्ल्ड चॅम्पियन होताच संघातील स्टार खेळाडूने लग्नाचा मुहूर्त काढला आहे. भारताच्या टी-२० वर्ल्ड चॅम्पियन संघाचा भाग असलेला कुलदीप यादव याच आठवड्यात लग्नबंधनात अडकणार आहे.

१४ मार्चला मसुरी येथे कुलदीप यादव वंशिकासोबतत सात फेरे घेणार आहे. टी-२० वर्ल्डकप स्पर्धेआधी या जोडीचा साखरपुडा उरकला होता. १७ मार्चला लखनऊ येथील सेंट्रम हॉटेलमध्ये कुलदीप आणि वंशिका जोडीने आपल्या मित्र परिवारासाठी भव्य रिसेप्शन पार्टीचे आयोजनही केले आहे. ते दोघेही मूळचे कानपूरचे असून बालपणीपासून एकमेकांना ओळखतात.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com